□□

**प्रा.दि.य.देशपांडे यांची तत्त्वज्ञानाची पुस्तके पुन:प्रकाशित**

**1) तत्त्वज्ञानाच्या मूलभूत समस्या — किं.200.00 रु.**

**2) नीतिशास्त्राचे प्रश्न — किं.100.00 रु.**

(टपालखर्च वेगळा)

कृपया महाविद्यालये, संस्था, विद्यार्थी यांनी ग्रंथांच्या उपलब्धतेकरिता नजीकच्या ग्रंथविक्रेत्याकडे चौकशी करावी. काही अडचण उद्‌भवल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा.

**प्रकाशक : विनोद लोकरे, विसा बुक्स**

'स्वागत' 55 डागा ले-आउट, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर 440033.

मोबाईल : 9823287273

हे मासिक विद्यागौरी खरे यांनी श्याम ब्रदर्स, रामबाग रोड, गणेशपेठ, नागपूर येथे छापून मोहनीभवन, धरमपेठ, नागपूर 440 010 येथे प्रकाशित केले. दूरभाष : अ.य.खरे : 2531948

दिवाकर मोहनी : 2558128, **सर्व पत्रव्यवहार मोहनी-भवन, धरमपेठ, नागपूर - 440 010 या पत्त्यावर करावा.**

ह्या मासिकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



XX-11

फेब्रुवारी 2010

वर्ष 20 - अंक 11

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

## भुकेचा जागतिक व राष्ट्रीय संदर्भ

963 दशलक्ष लोक सध्या जगात तीव्र उपासमारीने ग्रस्त आहेत. 2009 अखेर ही संख्या 100 कोटींवर जाऊ शकते. जगात तीव्र उपासमारीने ज्यांना आवश्यक पोषक आहार मिळत नाही, अशांपैकी दोन तृतीयांश लोक भारत, चीन, काँगो, बांगलादेश, इंडोनेशिया, पाकिस्तान आणि इथिओपिया या देशांत आहेत. जागतिक भूक निर्देशांकानुसार पुरेसा पोषक आहार न मिळणाऱ्या, जगातील 88, देशांमध्ये भारताचा 66 वा क्रमांक लागतो. तथापि, संख्येच्या तुलनेत (200 दशलक्ष) भारताचा पहिला क्रमांक लागतो. आपल्या देशात कुपोषितांची संख्या वाढते आहे. आणि ती फक्त गरिबांतच वाढत आहे, असे नाही. वरच्या आर्थिक स्तरातही ती दिसते.

(संदर्भ : युनोच्या अन्न व कृषी संघटनेच्या 'जागतिक अन्न असुरक्षिततेची स्थिती 2008' या अहवालाबाबतचा 17 डिसेंबरचा *टाईम्स ऑफ इंडिया*चा अग्रलेख))

## ह्या अंकात


1. भुकेचा जागतिक व राष्ट्रीय संदर्भ — 409
2. संपादकीय — मिलिंद मुरुगकर 411
3. रेशनचा प्रश्न व चळवळ : नवे संदर्भ, नवे डावपेच — सुरेश सावंत 413
4. गरिबांसाठीचा निधी श्रीमंतांच्या घशात का घालत आहात? — राजीव साने 422
5. भ्रष्ट, अकार्यक्षम रेशनव्यवस्थेला ठोस पर्याय — मिलिंद मुरुगकर 426
6. रेशनव्यवस्थेचे पूर्ववत सार्वत्रिकीकरण हवेच — उल्का महाजन 435
7. अन्न-अधिकार-कायदा ह्र योजनेपासून हक्कापर्यंत — अश्विनी कुळकर्णी, दिप्ती राऊत 439
8. वैचारिक प्रवास : भेदाकडून अभेदाकडे जाणारा — किशोर बेडकीहाळ 443
9. कसोटीचा दगड ....... पाठराखा. — नंदा खरे 447



**संस्थापक-संपादक**
**दि. य. देशपांडे**

**संपादक मंडळ**
नंदा खरे (कार्यकारी), सुनीती देव, दिवाकर मोहनी

**सल्लागार-मंडळ :** प्रमोद सहस्रबुद्धे, उत्तरा सहस्रबुद्धे, प्रभाकर नानावटी, टी.बी. खिलारे, रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ, मिलिंद मुरुगकर, अश्विनी कुळकर्णी, लोकेश शेवडे, सुलक्षणा महाजन



विशेषांक रु. 75, किरकोळ अंक रु. 25.00 (टपालखर्च वेगळा)
वार्षिक वर्गणी : व्यक्तीला रु. 175.00, संस्थेला रु. 200.00
परदेशीय वर्गणीदारांकरिता वार्षिक वर्गणी : व्यक्तीला 25 डॉलर, संस्थेला 30 डॉलर (अधिक वटणावळ)
दहा वर्षांची आगाऊ वर्गणी देणाऱ्यांस बारा वर्षे अंक मिळेल.
वर्गणी कृपया डिमांड ड्राफ्टने, मनीऑर्डरने किंवा चेकनेच पाठवावी.
परगावाहून चेक पाठविल्यास वटणावळीकरिता रु. 50.00 जास्त पाठवावेत. व्ही.पी.ची पद्धत नाही.
मनीऑर्डर, चेक, ड्राफ्ट इ. आजचा सुधारकच्या नावे नागपूर पत्त्यावर पाठवावे.
वर्गणी भरण्याची ठिकाणे :
पोस्टाने आणि नागपूरमध्ये : मोहनीभवन, धरमपेठ, नागपूर-440 010.
पुण्यामध्ये रोखीने : मिळून साऱ्याजणी, 40 ब, भोंडे कॉलनी, देवनाळकरांचा बंगला, अलुरकर म्यूझिक हाऊससमोर, कर्वे रोड, पुणे - 411 004




# संपादकीय

जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईने स्वतंत्र भारताच्या इतिहासातील उच्चांक गाठला आहे. या महागाईला देशातील कोट्यवधी गरीब जनता कशी तोंड देत असेल याचा विचारही हृदयद्रावक आहे.

1990 नंतरच्या अर्थव्यवस्थेने घेतलेल्या नवीन वळणानंतर देशाचा अर्थिक विकासाचा दर झपाट्याने वाढता राहिला. या विकासाचा फायदा अतिशय विषम पद्धतीने जनतेपर्यंत पोहचला. त्यामुळे समृद्धीची काही बेटे तयार झाली. पण फार मोठ्या जनसंख्येला विकासाचा अत्यल्प लाभ मिळाला. इतर मोठ्या संख्येला तो काहीच मिळाला नाही. जागतिकीकरणाच्या रेट्याबरोबर झालेल्या माहिती तंत्रज्ञानाच्या स्फोटामुळे समृद्धीच्या चकचकीत बेटांच्या प्रतिमा आपल्यासमोर वारंवार नाचत राहिल्या. या प्रतिमांमुळे देशातील अफाट दारिद्र्य मात्र झाकोळले गेले.

1970-80 च्या दशकात महागाईच्या विरोधात मोठा आवाज उठवला जायचा. लोक रस्त्यावर उतरायचे. मृणाल गोरे व अहिल्याबाई रांगणेकरांचा लाटणे मोर्चा वृत्तपत्रांचा मथळा बनायचा. दुर्दैवाने आज असे मोर्चे निघत नाहीत. देशात अफाट दारिद्र्य असताना व तितकीच अफाट महागाई असताना हे का घडत नाही हा संशोधनाचा विषय आहे. कदाचित् देशातील वर्गीय समीकरण असे बदलले की गरीब जनतेचे नेतृत्व करणारा मध्यम वर्गच आता उरलेला नाही. त्याला आता महागाईची झळच बसत नाही. कारण काहीही असो, गरीब जनतेची अन्नसुरक्षा आज कमालीची धोक्यात असताना या मुद्द्याचा राजकीय दबाव नगण्य असावा ही चिंताजनक गोष्ट आहे.

गरीब जनतेची अन्नसुरक्षा साधण्यासाठीची जगातील सर्वांत मोठी व्यवस्था म्हणजे भारतातील रेशनव्यवस्था. ही व्यवस्था भ्रष्टाचाराने कोलमडलेली आहे. देशातील बहुसंख्य गरीब जनतेला या व्यवस्थेपासून कोणताही लाभ पोहचत नाही. या निराशाजनक पार्श्वभूमीवर काही आशादायकही घडत आहे. 'देशातील गरीब जनतेचा अन्नाचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे' असा कायदा आणण्याचे आश्वासन काँग्रेसप्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडीने दिले आहे. या कायद्याच्या स्वरूपाविषयी सरकारच्या पातळीवर व स्वयंसेवी संस्थांमध्ये चर्चा चालू आहे. हा कायदा गरिबांची अन्नसुरक्षा साधण्यासाठीच्या दिशेने टाकलेले प्रभावी पाऊल ठरू शकते. पण या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. नुसता कायदा करून काय उपयोग ? आजची भ्रष्टाचाराने व अकार्यक्षमतेने पोखरलेली रेशन-व्यवस्था हे ध्येय साध्य करण्यास समर्थ आहे का ? की त्याऐवजी गरिबांना अन्नासाठीचे अनुदान थेटपणे देणारी स्मार्ट कार्डस् अथवा फूड स्टँम्प्सची व्यवस्था उभारणे गरजेचे आहे ? त्यापलीकडेही काही गुंतागुंतीचे प्रश्न आहेत. अन्नाचे अनुदान मिळण्यासाठीच्या पात्रतेचे निकष काय असावेत ?

अन्नसुरक्षा व्यवस्था लक्ष्याधारित (targeted) असावी की सार्विक (univer-

sal) असावी ? हा वादाचा मुद्दा बनला आहे. या व्यवस्थेतून एकही गरीब वगळला जाऊ नये यासाठी ती सार्विक असावी अशी मांडणी केली जाते. गरिबांच्या अन्नसुरक्षेचा विषय देशातील गरीब धान्योत्पादक शेतकऱ्यांशीही निगडित आहे. धान्याचे किफायतशीर भाव हे केवळ शेतकऱ्यांसाठीच नाही तर दूरगामी दृष्टिकोणातून पाहिल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला गतिमान करण्यासाठी आवश्यक असतात. पण असे भाव हे गरीब ग्राहकांवरील संकट ठरते व या गरीब ग्राहकांतील मोठी संख्या ही ग्रामीण भागातील लहान शेतकरी, शेतमजूर, छोटे कारागीर यांची असते. शेतीमालाच्या भावाचा हा तिढा सोडवायचा कसा ? गरिबी हा या देशातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे असे आपण मानणार असू तर हा तिढा सोडवणे हा या देशापुढील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न ठरतो. थेट सबसिडीचा पर्याय ह्या प्रश्नावरील उत्तर आहे का ?

रेशन-व्यवस्थेच्या संदर्भातील वरील विविध मुद्द्यांचे, विविध विचारांचे प्रतिबिंब *आजचा सुधारक*च्या या अंकात पडावे असा प्रयत्न होता. तो कितपत साध्य झाला हे वाचकांनी ठरवायचे आहे.

*ह्व मिलिंद मुरुगकर*

□ □

---

## Food Security

'Food Security exists.... When all people, at all times, have access to sufficient, safe and nutritious food to meet their dietary needs and food preferences for an active and healthy life.'

*-- Food and Agriculture Organization (F.A.O.), United Nations.*

## अन्नसुरक्षा म्हणजे काय?

'सक्रिय आणि आरोग्यसंपन्न जीवन जगण्यासाठी सर्व माणसांना, सर्वकाळ त्यांच्या आहाराची गरज व अन्नपदार्थांचा प्राधान्यक्रम यांची पूर्तता करणारे पुरेसे, सुरक्षित व पौष्टिक अन्न मिळणे म्हणजे अन्नसुरक्षा होय.'

-- *(संयुक्त राष्ट्रसंघाची अन्न व कृषी संघटना)*

---



# रेशनचा प्रश्न व चळवळ : नवे संदर्भ, नवे डावपेच

*सुरेश सावंत*

रेशनचा प्रश्न खूप महत्त्वाचा व गंभीर आहे, हे खरे. पण तो आता सर्वांचा राहिलेला नाही, हेही खरे. आणि तो सर्वांचा राहिलेला नसला तरी त्याचे गांभीर्य कमी होत नाही, हेही खरे.

वरील तीन विधाने रेशनच्या प्रश्नाच्या स्वरूपासंबंधी आहेत. एखादा प्रश्न सोडवताना त्याच्या स्वरूपाची वस्तुनिष्ठ नोंद घेणे आवश्यक असते, अन्यथा डावपेचांची आखणी फसण्याची शक्यता असते. रेशनच्या प्रश्नाची स्वरूप-निश्चिती व तो सोडवण्याचे डावपेच, यासंबंधीचे काही मुद्दे नमुन्यादाखल मी येथे मांडणार आहे. रेशन चळवळीतील एक कार्यकर्ता म्हणून आलेल्या अनुभवांच्या आधारे ते मांडणार आहे. अभ्यासकांनी, विचक्षक वाचकांनी त्यात भर घालावी, दुरुस्ती सुचवावी ही अपेक्षा आहेच.

### रेशनचा प्रश्न नेमका कोणाचा?

रेशनची सुरुवात झाली तो काळ अन्नधान्याच्या टंचाईचा होता. खाजगी व्यापाऱ्यांची साठेबाजी, नफेखोरी भरास आलेली होती. आर्थिक कुवत असलेला वर्ग अत्यल्प होता. याचा अर्थ, जवळपास सर्वांनाच व्यापाऱ्यांच्या नफेखोरीपासून संरक्षण म्हणून रेशनची गरज होती. 72-73 च्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर तर मुंबईसारख्या शहरात राहणाऱ्या अनेकांना खुल्या बाजारात धान्य, तेल यांच्या विक्रीला बंदी घातल्याचे आठवत असेल. फक्त रेशनवरच या गोष्टी मिळत असत. आमच्याकडे स्वतःची मोटार होती (म्हणजे आम्ही ऐपतवाले होतो), तरी आम्हाला रेशनच्या रांगेत उभे राहावे लागत होते, कारण खुल्या बाजारात धान्य, तेल मिळतच नव्हते, असा अनुभव अनेकजण आजही सांगतात. हरितक्रांतीची प्रक्रिया याच काळात सुरू होती. त्याची फळे मिळायला पुढच्या काळात सुरुवात झाली. खुल्या बाजारात धान्याची उपलब्धता वाढू लागली. ज्यांची ऐपत होती, ते खुल्या बाजारात खरेदी करू लागले. याच काळात संघटित कामगारांचे वेतनमान वाढू लागले. क्रयशक्ती दुबळी असलेला मध्यमवर्ग, कनिष्ठ मध्यमवर्ग यांचा आर्थिक स्थिरतेकडे व पुढे सुस्थिरतेकडे प्रवास सुरू झाला. या प्रवासाबरोबरच रेशनच्या रांगेतून तो क्रमशः नाहीसा झाला. रॉकेलसाठी म्हणून येणारेही गॅस सहज मिळू लागल्यानंतर रेशन दुकानाकडे फिरकेनासे झाले. आज चाळिशीच्या पुढे असणाऱ्या मध्यमवर्गीयांना आपण लहानपणी रांगेत कसे उभे राहायचो, हे आठवते. पण त्यांच्या मुलांचा आणि रेशनचा काहीही संबंध आज नाही. हा मध्यमवर्ग आज 30 टक्क्यांच्या आसपास, म्हणजे 35 कोटी लोकसंख्येच्या दरम्यान आज देशात आहे.त्याला तर निश्चितपणे रेशनची आज गरज नाही. उरलेल्या 70 टक्क्यांचीच ती असू शकते. अर्थात, 30:70 हे गुणोत्तर सगळीकडे सारखे आहे, असे नाही. 70 टक्क्यांमध्येही अनेक स्तर आहेत. गरीब, अतिगरीब, निराधार, भणंग, बेघर इ.. हे सर्वजण असंघटित कामगार, अस्थिर जीवन जगणाऱ्या समुदायात मोडतात. कोणी नाका कामगार असतो, कोणी बांधकाम

कामगार असतो, कोणी सफाई कामगार असतो, कोणी कंत्राटावर कंपनीत अल्पवेतनात काम करत असतो, कोणी मोलकरणी असतात, तर कोणी कचरा-वेचक. काही ट्रॅफिक सिग्नलवरह्ललोकल ट्रेन्समध्ये मुलांना पाठीवर बांधून विक्री करत असतात, मिळेल ते काम करत असतात. संघटित कामगारांप्रमाणे यांना महागाई भत्ता लागू नसल्याने महागाईच्या तीव्रतेप्रमाणे यांची आवक वाढत नाही. सध्याच्या वाढत्या महागाईचा खरोखर 'फटका' बसणारा हा वर्ग आहे. त्याला रेशनच्या संरक्षणाची नितांत गरज आहे. पण हे संरक्षण त्याला परिणामकारकरीत्या मिळत नाही. यातल्या अनेकांची तर रेशनव्यवस्थेने दखलच घेतलेली नाही. त्यांना रेशनकार्डच नाही.

## प्रश्न गंभीर; मग दखल का नाही?

या विभागाच्या रेशनच्या प्रश्नांना अनेक आयाम आहेत. पण दुर्दैवाने त्यांची तशी चर्चाच होत नाही. हा विभाग पूर्वी रेशनवर असलेल्या मध्यमवर्गाप्रमाणे बोलका नाही. बाजारात उपलब्धता असल्याने थोडे अधिक कष्ट करून अधिक कमवून तो वस्तू खरेदी करतो (अर्थव्यवस्थेत अधिक कमाईसाठी अधिक मेहनतीचा आज तरी त्याला अवकाश आहे). काही वेळा उपभोग कमी करतो, पण त्याचे जीवन पूर्णतः अडले असे होत नाही. त्याचे 'जगणे' होत नसले, तरी 'तगणे' होत असते. त्यामुळे आक्रोश करत रस्त्यावर उतरून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याइतके त्याचे उपद्रवमूल्य आज नाही. तसे त्याचे जाणतेपणही नाही. असे उपद्रवमूल्य दाखवल्याशिवाय प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधले जात नाही. स्वतःहून तो प्रश्न समजून घेऊन मांडण्याइतकी उसंत (टीआरपी वाढविण्याच्या व्यग्रतेमुळे) त्यांना नसते. मतांवर प्रभाव पाडण्याइतके उपद्रवमूल्य नसल्याने (यातले काही तर मतदारच नसतात) राजकीय पक्षांनाही त्या प्रश्नाचे मोल नसते. याला दक्षिणेकडील काही राज्यांचा अपवाद आहे. तसेच काही डाव्या पक्षांचाही अपवाद आहे. पण यातही हा प्रश्न सातत्याने व समग्रपणे लावून धरणारे अपवादानेच आहेत. अभ्यासकांच्या पातळीवर हा प्रश्न अनेकदा उपलब्ध आकडेवारीच्या मर्यादेतच राहतो. एखाददुसरा अपवाद वगळता चळवळीतल्या लोकांसोबत राहून हा अभ्यास होताना दिसत नाही. शिवाय हे अभ्यास-अहवाल बहुधा इंग्रजीतच असतात, स्थानिक भाषेत नसतात. त्यामुळे त्याचे उपयोजन किंवा त्यातून सामान्य कार्यकर्त्यांना दिग्दर्शन होते आहे, असे घडत नाही. स्वयंप्रेरित, ध्येयवादी शिक्षित कार्यकर्त्यांची प्रगतिशील चळवळीतील भरती एकूणच रोडावल्याने याही चळवळीत तसे कोणी येत नाहीत. जे कोणी प्रगतिशील कार्यकर्ते विविध चळवळींत आज आहेत, त्यांतले बरेचसे आपापल्या चळवळींच्या चाकोरीतच अडकलेले आढळतात. व्यापक परिवर्तनासाठी परस्परांशी संवादी राहण्याचे अवधान त्यांच्याकडून राखले जातेच, असे नाही. इतर अनेक चळवळींप्रमाणे रेशनच्या चळवळीतही या पोकळीत आज आढळतात, ते प्रामुख्याने एनजीओचे लोक. ते लोकांना खूप मदत करत असतात, आंदोलनांत सहभागी होत असतात, लोकांना संघटित करत असतात. वस्तीतील त्यांची उपलब्धताही चांगली असते. तथापि, स्वयंप्रेरित, ध्येयवादी कार्यकर्त्यांचा सामाजिक-राजकीय जाणतेपणाचा



सहभाग नसणे, ही उणीव त्याने भरून निघत नाही. शिवाय एनजीओंद्वारा होणारी साधनांची सहज उपलब्धतता समुदायांच्या तन-मन-धनाच्या आधारे चळवळीने स्वावलंबी बनण्यात अनेकदा अडथळा ठरते. या सर्वांच्या परिणामी, रेशन हा एक मोठा प्रश्न असला तरी, नेमकेपणाने, सुस्पष्टपणे, सर्वांगांनी समोर येत नाही.

या बदललेल्या संदर्भांच्या पार्श्वभूमीवर या प्रश्नाचे काही आयाम व त्यासंबंधीचे संभाव्य उपाय आणि डावपेच समजून घेऊया.

## रेशन प्रश्नाचे विविध आयाम, उपाय व डावपेच

1997 साली सरकारने रेशनव्यवस्था लक्ष्याधारित केली. त्याआधी ती सार्वत्रिक होती. प्रत्येकाला एकाच रंगाचे कार्ड, एकाच दराचे व एकाच प्रमाणात धान्य. ज्यांना गरज नाही, त्यांना रेशनव्यवस्थेतून वगळणे आणि गरजवंतांना अधिक स्वस्तात, अधिक प्रमाणात शिधावस्तू देणे व त्यायोगे सरकारचा अस्थानी खर्च कमी करणे, हे सूत्र या धोरणामागे होते. सूत्र योग्यच होते. पण या सूत्राप्रमाणे व्यवहार घडला नाही. धोरणकर्त्यांमधील तळातील वेध घेण्याच्या दृष्टीचा अभाव, राजकारणी, नोकरशहा व व्यापारी-दलाल यांचा भ्रष्टाचार व लोकांप्रतीची अनास्था यांमुळे हे सूत्र भोवंडून गेले. उदाहरणार्थ,

1. केंद्र सरकारने लाभार्थींची मर्यादा (सरकारी भाषेत *इष्टांक;* चळवळीच्या दृष्टीने *अनिष्टांक*) ठरवून दिलेली असल्याने सर्व पात्र लाभार्थींचा समावेश होत नाही.
2. पात्र असूनही प्रचलित दारिद्र्यरेषा यादीत नाव नसल्याने लाभ मिळत नाही.
3. मुंबईसारख्या शहरांमध्ये ग्रामीण भागाप्रमाणे सर्व कुटुंबांची नोंद करणारी दारिद्र्यरेषा यादी नाही. महानगरपालिकेच्या सुवर्ण जयंती रोजगार योजनेसाठीची दारिद्र्यरेषा यादी निवडक कुटुंबांची व वस्त्यांची असल्याने असंख्य पात्र लाभार्थींची नोंद तिथे असेलच, याची खात्री नसते.
4. महाराष्ट्रात आज तीन प्रकारच्या दारिद्र्यरेषा याद्या आहेत. ग्रामीण विकास-यंत्रणेची (डीआरडीएची) वार्षिक 20,000 रु., सुवर्ण जयंती रोजगार योजनेची वार्षिक35,475 रु. व रेशनसाठी 15,000 रु. अशाप्रकारे एकाच राज्यात गरीब मोजण्याचे 3 मापदंड असण्यात काहीच तर्क नाही. शिवाय त्यामुळे गोंधळच होतो. 2002 ची ग्रामीण विकास यंत्रणेची नवी यादी आल्यानंतर या गोंधळात आणखी भर पडली आहे.
5. रेशनसाठीची वार्षिक 15,000 रु. उत्पन्नमर्यादा शहरासाठी व 4,000 रु. ग्रामीण भागासाठी लक्ष्याधारित सार्वजनिक वितरणव्यवस्थेच्या सुरुवातीला, म्हणजे 1997 साली महाराष्ट्रात ठरवण्यात आली. मधल्या काळात ग्रामीणची मर्यादा वाढवण्यात येऊन तीही 15,000 रु. वार्षिक करण्यात आली. आज अकरा वर्षे उलटून गेल्यावरही ती तेवढीच राहावी, यातही काही तर्क नाही. दरम्यानच्या काळात वाढलेल्या महागाई निर्देशांकाप्रमाणे संघटित कामगारांचे पगार कितीतरी पटीने वाढले. मात्र या पगारवाढीचा न्याय रेशनसाठीचे गरीब ठरविण्यासाठी वापरण्यात आला नाही, ही त्या गरिबांची क्रूर चेष्टा आहे.

6. आर्थिक उत्पन्नमर्यादा गरीब ठरवताना अपुरी आहे. मुंबईत अनेक कचरा-वेचक कुटुंबातील सर्व सदस्यांचे एकत्रित उत्पन्न वार्षिक 15,000 रु. च्या वर जाते; पण त्यांचे अतिशय घाणीत काम करणे, बकाल वस्त्यांत वास्तव्य करणे, त्यामुळे होणाऱ्या आजारांसाठी होणारा खर्च इ. लक्षात घेता त्यांचे जीवन अत्यंत निकृष्ट असते. पण तरीही ते अधिकृतपणे बीपीएलमध्ये गणले जात नाहीत. हीच स्थिती असंघटित कामगार व अस्थिर जीवन जगणाऱ्या सर्व समुदायांची आहे. आज मुंबईसारख्या शहरात गरिबातला गरीबही 15,000 रु. वार्षिक उत्पन्नमर्यादेत जगूच शकत नाही. वास्तविक ज्यांना बीपीएलची रेशनकार्डे देण्यात आली आहेत, त्यातल्या एकाही कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न वरील मर्यादेत असण्याची अजिबात शक्यता नाही.
7. शिवाय रेशनकार्ड देताना आवश्यक ती वास्तव्याची व मूळ ठिकाणचे रेशनकार्ड रद्द केल्याची कागदपत्रे अशी दुबळी कुटुंबे सादर करू शकत नसल्याने त्यांना रेशनकार्ड मिळत नाही.
8. कागदपत्रांची अट शिथिल करणारे काही जी.आर. शासनाने काढले आहेत. तथापि, केंद्रीय गृहखात्याकडून रेशनकार्ड देताना विशेष दक्षता घेण्यासंबंधी, तसेच चारित्र्य व कागदपत्रांची पडताळणी करण्यासंबंधीचे आदेश येत गेल्याने या शासननिर्णयाची परिणामकारक अंमलबजावणी होत नाही. रेशनकार्ड हे रेशनसाठीच असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात रेशनकार्ड हे वास्तव्य व नागरिकत्व सिद्ध करण्याचे एक साधन झाल्याने हे होत आहे. परिणामी, आजही असंख्य गरजवंत कुटुंबे रेशनच्या कक्षेबाहेरच आहेत.

यावर तसेच एकूण रेशनव्यवस्था सुधारण्यासाठीचे काही उपाय असे आहेत :

1. सर्वप्रथम रेशनकार्ड हे वास्तव्याचा पुरावा म्हणून वापरले जाणे पूर्णतः बंद करणे. त्यासाठी केवळ आदेश काढून चालणार नाही. (असे अनेक आदेश महाराष्ट्र शासनाने काढले आहेत. रेशनकार्डावर छापील सूचनाही करण्यात आली आहे. तरीही व्यवहारात पासपोर्ट, न्यायालय, नोकरी, शाळा, हॉस्पिटल, पोलीस इ. अनेक ठिकाणी रेशनकार्डाचा वास्तव्याचा पुरावा म्हणून वापर होतोच.) यासाठी 'कुटुंबओळखपत्रा'चा पर्याय दिला पाहिजे. मतदार ओळखपत्र हे एका व्यक्तीचे असल्याने त्याचा उपयोग होत नाही. रेशनकार्डावर कुटुंबातील सर्व सदस्यांचा तपशील, वय, नाते इ. असतो. असा तपशील असणारे 'कुटुंब ओळखपत्र' सर्व नागरिकांना द्यायला हवे. (हे ओळखपत्र देण्यासाठी प्रारंभी रेशन यंत्रणेचाही वापर करता येईल.) त्यानंतर ज्यांना रेशनसाठी रेशनकार्डाची गरज नसेल, अशा कुटुंबांना रेशन कार्डे परत करण्याचे (सरेन्डर) करण्याचे आवाहन करावे. आज दिसणारी बिगर रेशनसाठी रेशनकार्डे काढण्यासाठी येणाऱ्यांची गर्दी मग नाहीशी होईल. ते सर्व कुटुंब ओळखपत्रासाठी रांगा लावतील. आता रेशन कार्यालयात रेशनकार्ड काढण्यासाठी येणारा माणूस हा रेशनसाठीच रेशनकार्ड काढणारा असेल. त्याच्या अर्जातील व्यक्ती व राहण्याची जागा यांची प्रत्यक्ष पाहणी करून रेशन इन्स्पेक्टर तात्पुरते अथवा कायमस्वरूपी रेशनकार्ड देण्याची शिफारस आपल्या वरिष्ठांना करू शकेल. रेशनकार्डाचे महत्त्वच कमी झाल्याने कागदपत्रांच्या जंजाळात या माणसांना अडकविण्याचे आता कारणच उरणार नाही. श्रीमंत, उच्च व मध्यमवर्गीय लोकांना कुटुंब ओळखपत्रातच रस असल्याने त्यांनी रेशनकार्ड काढण्याची शक्यता मंदावते. म्हणजेच कनिष्ठ मध्यवर्गीय, गरीब व अतिगरीब विभागच रेशनकार्ड काढतील. समाजातील वरचा 30 टक्क्यांहून अधिक विभाग अशा रीतीने व्यवस्थात्मक (सिस्टिमिक) बदलामुळे बाहेर पडेल व गरजवंतच रेशनव्यवस्थेत राहतील. एका वेगळ्या व चांगल्या अर्थाने रेशनव्यवस्था लक्ष्याधारित होईल. आताच्या व्यवस्थेतील 'रॉंग एक्सक्लुजन' व 'रॉंग इन्क्लुजन' हे दोन्ही दोष टाळता येतील. बोगस कार्डांच्या व सबसिडी वाया जाण्याच्या समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होतील. केंद्र सरकारने माहिती तंत्रज्ञ नंदन नीलकेणी यांच्या नेतृतवखाली एकमेवाद्वितीय ओळख क्रमांक (युनीक आयडेंटिफिकेशन नंबर) भारतातील प्रत्येक नागरिकाला देण्यासाठीचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. तो यशस्वी झाल्यास वरील हेतू सिद्धीस जाण्याची शक्यता दिसते.
2. हे झाल्यावर जे रेशनव्यवस्थेत राहतील त्या सर्वांना अनुदानित स्वस्त शिधावस्तूंचा लाभ देता येईल. केंद्र सरकारने आवश्यकतेप्रमाणे इष्टांक वाढवून द्यायला हवा. नाहीतर राज्य सरकारने तो भार उचलावा. तामिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश, छत्तीसगढ ही राज्ये असा भार उचलत आहेत. स्वतःची अशी काहीही स्वतंत्र पद्धत न अवलंबता केंद्राने ठरवून दिलेल्या इष्टांकाप्रमाणे व स्वतःची काहीच अधिक रक्कम न घालता राज्य सरकार रेशनच्या योजना राबवत आहे. दिल्ली सरकारने 1 लाख रुपयांपर्यंतच्या रेशनकार्डधारकांना 35 किलो धान्याची गॅरंटी दिली आहे. महाराष्ट्रात, खास करून मुंबईत प्रत्येक बीपीएल कुटुंबाला प्रति महिना फक्त 1 ग्रॅम धान्य वाट्याला येते, असा वृत्तांत हिंदुस्तान टाईम्स या दैनिकाने मध्यंतरी प्रसिद्ध केला होता!
3. हे होईपर्यंत अंतरिम पाऊल म्हणून बीपीएलसाठीचा आर्थिक निकष रद्द करून व्यवसाय व राहण्याची जागा यांच्या आधारे बीपीएल रेशनकार्ड देण्यात यावे. उदा. नाका कामगार, बांधकाम कामगार, वीटभट्टी किंवा ऊसतोडणी कामगार, मोलकरणी किंवा घरगडी, झोपडपट्टीत राहणारे इ.ना बीपीएल रेशनकार्ड द्यावे. कचरा-वेचक, हातगाडी ओढणारे, सायकल रिक्शा चालवणारे, आदिम जमाती इ.ना सरसकट 'अंत्योदय' योजनेत घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. बीपीएलच्या यादीत त्यांचे नाव असण्याची गरज नाही. त्याच धर्तीवर, नाल्याच्या शेजारी राहणारे, डोंगर उतारावर राहणारे, डंपिंग ग्राऊंडवर किंवा त्याच्या जवळ राहणारे, फुटपाथवर राहणारे, विस्थापित इ.ना अंत्योदय मध्ये घेण्यात यावे.
4. वरील पद्धतीतून एक बाब उघड होते, ती म्हणजे, प्रचलित बीपीएल यादीचा व रेशनकार्डाचा संबंध तोडावा. बीपीएल यादी ही 5 वर्षांसाठी असते. ती खुली-ओपनएंडेड नसते. त्या यादीत चुकीच्या सर्वेक्षणामुळे न आलेले अथवा दरम्यानच्या काळात

परिस्थिती ढासळलेले लोक सवलतीच्या रेशनला वंचित राहतात. वाढत्या महागाईच्या काळात अन्न-असुरक्षितता ही प्रवाही स्थिती असते. जागतिक बँकेच्या अध्यक्षांनी मध्यंतरी सांगितले होते की, वाढती महागाई व जागतिक अन्न-अरिष्टामुळे अजून 10 कोटी लोक गरीब होतील.

5. शहरात वस्ती सभा, चाळ सभा, त्या विशिष्ट वस्तीतील बचतगट अथवा महिला मंडळांच्या सर्व सदस्यांची सभा (महिला ग्रामसभेच्या धर्तीवर) आयोजित करून त्यांच्यापुढे बीपीएल, अंत्योदय व अन्नपूर्णा लाभार्थींची संभाव्य यादी मांडावी व मंजूर करून घ्यावी. काही ठिकाणी त्यांनाच ती पीआरए (पार्टिसिपेटरी रॅपिड अप्रायजल) तंत्राचा वापर करून तयार करण्यास सांगावी. पारदर्शकतेसाठी ही प्रभावी पद्धती आहे. पीआरएचे प्रशिक्षण करणे मात्र आवश्यक आहे.
6. ग्रामीण भागात ग्रामसभेऐवजी वाडी-सभा तसेच महिला-सभेचा वापर यासाठी करावा.
7. दरवर्षी लाभार्थ्यांचे पुनर्विलोकन करावे. पात्र असलेल्यांचा समावेश करावा, अपात्रांना बाहेर काढावे. या सर्व कामात स्वयंसेवी संस्थांचे सहाय्य घेता येईल. वरील वस्ती व वाडी सभांचा त्यासाठी वापर करता येईल.
8. रॉंग इन्क्लुजनऐवजी रॉंग एक्स्क्लुजन हा अधिक चिंतेचा विषय असायला हवा. शंभर अपराधी सुटले तरी चालतील पण एकही निरपराध सापडू नये, असे सूत्र न्यायालयीन खटल्यात वापरले जाते. अन्नसुरक्षेचा प्रश्न हा जीवन जगण्याशीच असल्याने त्यात तर हे तत्त्व असलेच पाहिजे. राज्यकर्त्यांचे उद्दिष्ट सबसिडी वाचवणे हे नव्हे, तर माणसाला उपासमारीपासून वाचवणे, हे असले पाहिजे. याचा अर्थ, चुकीचा समावेश टाळण्याकडे दुर्लक्ष करणे, असा नव्हे. ती दक्षता तर घ्यायचीच.
9. छत्तीसगढ राज्याने आपल्या राज्याची अशी स्वतंत्र ऑर्डर तयार केली आहे. तशी महाराष्ट्र सरकारने करण्याची गरज आहे. अशा ऑर्डरच्या स्वरूपात सर्व शासननिर्णय एकत्रितपणे अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना व जनतेला उपलब्ध झाल्यास त्यात दोहोंचीही सोय होते. अंमलबजावणीत गोंधळ वा गैरसमजुती राहत नाहीत.
10. रेशनव्यवस्थेच्या विकेंद्रीकरणाने यातील खूप प्रश्न सुटू शकतील. रेशनव्यवस्थेचे विकेंद्रीकरण याचा अर्थ केंद्राकडून धान्य न घेता राज्याने त्याच्या वाट्याची सबसिडी प्रत्यक्ष घ्यायची. या सबसिडीच्या रकमेतून आपल्या राज्याची विभागवार तसेच वर्षभरातील विविध हंगामांतील गरज, खाण्याच्या सवयी लक्षात घेऊन शक्यतो स्थानिक भरड धान्याची खरेदी करणे (सामान्य शेतकऱ्याचा हितसंबंधही त्यातून रेशनव्यवस्थेशी जोडला जाईल), स्थानिक उपलब्धता नसेल तर जेथून स्वस्तात मिळेल तेथून खरेदी करणे व जिल्हापातळीवर वाटपाचे नियोजन करणे. गावात बचतगटांद्वारे रेशनचे वितरण करणे, गावातील गरजवंतांची प्राधान्यक्रमाची यादी गावात महिला ग्रामसभा तसेच वाडी सभांद्वारे ठरवणे, यातील गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी लाभार्थींची दक्षता समिती तयार करणे, वगैरे उपाय करावे. या समित्या दुकाननिहाय असाव्यात. केंद्र सरकारने काही महिन्यांपूर्वी राज्यांनी त्यांच्या वाट्याची सबसिडी प्रत्यक्ष रकमेत घ्यावी व आपली धान्य खरेदी स्वतः करावी, असे आवाहन केले होते. त्यास 18 राज्यांनी प्रतिसाद दिला. महाराष्ट्र सरकार यास राजी नाही. महाराष्ट्र सरकारने ज्वारी-बाजरीपासून दारू बनविण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठीचे 23 प्रस्ताव मंजूर केल्याची बातमी आहे. केंद्र सरकारच्या आवाहनाला प्रतिसाद न देण्याचे बहुधा हेही कारण असावे.
11. महाराष्टातील 86 टक्के रेशनदुकानांचे अधिकृत उत्पन्न बीपीएलपेक्षा कमी आहे, असे सर्वोच्च न्यायालयाच्या कमिशनरांच्या अहवालात नोंदलेले आहे. तरीही रेशनदुकाने मिळविण्यासाठी आटापिटा, लाच देणे हे का चालते? उत्तर सरळ आहे – भ्रष्टाचार करण्यासाठी! यावर उपाय म्हणून बचतगटांना रेशनदुकाने देण्याचा निर्णय राज्य सरकारने 3 जानेवारी 2006 ला घेतला. पण रेशनदुकानदार व सर्वपक्षीय आमदारांच्या दबावाखातर तो निर्णय माघारी घेऊन नोव्हेंबर 2007 ला सुधारित निर्णय जाहीर केला. त्याप्रमाणे आता फक्त नवीन व बंद पडलेली रेशनदुकाने बचत गटांना द्यावयाची आहेत. प्रश्न आहे, ही दुकाने चालणार कशी? छत्तीसगढ सरकारने यावर केलेली उपाययोजना पथदर्शक आहे. 75 हजार रुपये 20 वर्षांच्या मुदतीने बिनव्याजी कर्ज, द्वार-वितरण योजनेद्वारा सरकार दुकानापर्यंत माल पोहोचवणार इ. प्रकारचे सहाय्य त्यांनी बचतगटांना केले आहे. त्यामुळे ती दुकाने चालू शकतात. महाराष्ट्रात जुन्या जी.आर.मध्ये वितरण-भवन, द्वार वितरण योजना इ. विशेष सवलती बचतगटांच्या दुकानांना देण्याचे नमूद केलेले होते. नव्या आदेशात हे सगळे गायब आहे. अशा स्थितीत ही दुकाने चालणे अशक्य होणार आहे. सरकारच्या मते बचतगटांना रेशनदुकाने देणे हा क्रांतिकारी निर्णय आहे. तो तसा व्हायचा तर या दुकानांना सरकारने विशेष बाब मानले पाहिजे व कमिशन वाढवून तसेच अन्य सुविधा देऊन ती चालतील ही जबाबदारी स्वतःची समजली पाहिजे. यासाठी एक मॉनिटरिंग कमिटी सरकारने नियुक्त केली पाहिजे. ही समिती राज्यातील बचतगटांना दिलेल्या काही निवडक दुकानांचा अभ्यास करेल, आवश्यक त्या सुधारणांसाठी सरकारला सूचना देईल, आणि या सूचनांची अंमलबजावणी झाली का तेही पाहील.
12. रोख सबसिडी देऊन खुल्या बाजारात धान्य खरेदी करण्याचा (फूड स्टँप किंवा स्मार्ट कार्ड) पायलट प्रोजेक्ट शहरातील एखाद्या भागात करावा. या कल्पनेच्या बाजूच्या तसेच विरोधी असलेल्या तज्ज्ञांची समिती नेमून त्याचा बारकाईने अभ्यास करावा. या अभ्यासाच्या निष्कर्षांवर तिच्या पुढील विस्ताराचा निर्णय घ्यावा. रोख सबसिडीची रक्कम संघटित कामगारांच्या पगाराप्रमाणे महागाई निर्देशांकावर ठरावी. ही रक्कम क्रेडिट कार्ड पद्धतीने (स्मार्ट कार्ड) वापरता येण्याची व्यवस्था करावी. सध्याच्या वाढत्या महागाईचा फटका तळाच्या विभागांना अधिक बसणार आहे. अमर्त्य सेन म्हणतात त्याप्रमाणे, वस्तूंची उपलब्धता नसणे हे उपासमारीचे कारण 1943 च्या बंगालच्या दुष्काळातही नव्हते. मुख्य कारण दुकानाच्या फळीवरील वस्तू खरेदी करण्याची क्षमता

(क्रयशक्ती) नसणे, हे होते. आजही तेच आहे. अशावेळी दुर्बलांना क्रयशक्ती बाहेरून देण्याचा प्रयोग करणे व त्याची परिणामकारकता तपासणे योग्य ठरेल. ज्यावेळी वस्तूंची उपलब्धताच धोक्यात येईल, त्यावेळी वस्तूंचेच रेशनिंग करावे लागेल. या लेखाच्या प्रारंभी नोंदवल्याप्रमाणे 70 च्या दशकात मुंबईसारख्या शहरात हे पाऊल उचलले गेले होते. अन्नअरिष्टाच्या पार्श्वभूमीवर मध्यंतरी अमेरिकेतल्या वॉलमार्टमध्ये एकावेळी तांदळाच्या चारपेक्षा अधिक पिशव्या दिल्या जात नाहीत, अशी बातमी होती. अशा रीतीने रेशनिंग वेळ आल्यास आपल्याकडेही करावे लागेल.

**डावपेचांविषयी आणखी थोडेसे...**

''महागाई वाढली आहे--रेशनव्यवस्था मजबूत करा'', एवढेच बोलून चालणार नाही. ती मजबूत कशी करायची, याचे वरीलप्रमाणे तपशील कार्यकर्त्यांना मांडावे लागतील. प्रत्यक्ष अंमलबजावणीत सहभागी व्हावे लागेल. लवचीकता व व्यावहारिकता दाखवावी लागेल. उदा. रेशनव्यवस्था सार्वत्रिक झालीच पाहिजे, ही काहींची घोषणा आहे. ''सरकारने रेशनव्यवस्था मोडीत काढण्यासाठी म्हणून लक्ष्याधारित केली. यामागे जागतिक बँकेचा दबाव आहे. या दबावापोटी शासन कल्याणकारी भूमिकेपासून ढळत आहे. त्याचा एक भाग म्हणून रेशनव्यवस्था लक्ष्याधारित करण्यात आली.'' ही यामागची धारणा. ही धारणा योग्य आहे, असे मानले, तरी रेशनव्यवस्था सार्वत्रिक असतानाच्या काळातही समाजातील वरचा थर रेशनवर येत नव्हता. त्याला बाजारात अधिक चांगल्या प्रतीचे धान्य उपलब्ध होते व ते खरेदी करण्याची त्याची क्षमता होती. ही वस्तुस्थिती आजही तीच आहे. समजा रेशनव्यवस्था सार्वत्रिक केली, तरी हा वर्ग रेशनवर येण्याची दूरान्वयानेही शक्यता नाही. बरे, ज्याची बाजारातून खरेदी करण्याची क्षमता आहे, त्याला काय म्हणून सवलतीचे धान्य रेशनद्वारे द्यायचे?

फूड स्टँपसारख्या प्रयोगांनाही याच मनोभूमिकेतून विरोध होतो. या भूमिकेनुसार, ''फूड स्टँप'' शब्द जरी उच्चारला, तरी तो उच्चारणारा जागतिक बँकेचा बगलबच्चा, जनविरोधी ठरतो. वस्तूंचे रेशनिंग व क्रयशक्तीचे रेशनिंग यात फरक आहे. आज रेशनवर सवलतीत धान्य मिळते, याचा अर्थ, खुल्या बाजारातील धान्याचा भाव व रेशनवरील धान्याचा भाव यातील फरकाची रक्कमच सरकार रेशनकार्डधारकाला देते. मग ती दुकानदाराकरवी का द्यावी? महागाई निर्देशांकाची जोड देऊन सरळ का देऊ नये? भारतीय अन्नमहामंडळाचे, शेतकऱ्यांचे मग काय होईल, असा प्रश्न उपस्थित केला जातो. त्यालाही उत्तरे आहेत. पण इथे त्याच्या तपशिलात जाणे योग्य ठरणार नाही. पण रॉकेलमध्ये सरळ अनुदानाची पद्धत स्वीकारण्यात तर शेतकरी किंवा भारती अन्न महामंडळाचा हितसंबंध आड येत नाही. बाजारभावाने रॉकेल विकणारी फ्री सेलची दुकाने जागोजाग काढायची. सगळ्यांना एकच भाव. ज्या गरिबांना किंवा सामान्यांना सवलतीत रॉकेल द्यायचे आहे, त्यांना फरकाची रक्कम आगाऊ द्यायची. याचा अर्थ 10 रु. लीटर हा रेशनचा भाव व बाजारातील विनाअनुदानित रॉकेलचा भाव समजा 40 रु. असला, तर 30 रु. ही फरकाची



रक्कम द्यायची. रॉकेलमधला काळाबाजार, त्यातले माफिया ही प्रचंड धोंड गरिबांच्या मार्गात सध्या आहे. ती दूर करण्यासाठीचे झगडे करत असतानाच प्रत्यक्ष सबसिडी देण्याचे व्यवस्थात्मक बदलाचे मार्ग का वापरू नयेत? ''न रहेगा बांस, न बजेगी बांसुरी'' अशा पद्धतीचे मार्ग का शोधू नयेत?

मुख्यमंत्री शीला दीक्षित यांनी दिल्लीत धान्याऐवजी रोख रक्कम देण्याचा पायलट प्रोजेक्ट करण्याचे योजले होते. 1,100 रु. दरमहा बीपीएल कुटुंबातील महिलेच्या बँक-खात्यात जमा होणार व महागाई निर्देशांकाप्रमाणे या रकमेत वाढ होणार असे प्रस्तावित होते, तथापि, अंतर्गत विरोधामुळे हा प्रयोग अजून सुरूच होऊ न शकल्याचे कळते. असे प्रयोग व त्यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास होणे नव्या काळात खूप निकडीचे आहे.

रेशनमध्ये 1 रु. पोहोचवायला 4 रु. खर्च, हा नियोजन आयोगाचाच निष्कर्ष असताना सबसिडी वाया जाण्याचे मार्ग रोखणे, ही चळवळीचीही जबाबदारी आहे की नाही? सध्या आपल्याला 335 रु.ला मिळणाऱ्या गॅस सिलेंडरची खरी किंमत आहे, 653 रु. म्हणजे सरकार स्वतःचे 318 रु. एका सिलेंडरमागे आपल्याला देते. (आंतरराष्ट्रीय बाजारातील भाव सतत वरखाली होत असल्याने या आकड्यांत बदल होऊ शकतो.) ही 318रु. ची सबसिडी सगळ्यांना का? ज्या 35 कोटींच्या मध्यमवर्गाचा प्रारंभी उल्लेख केला आहे, त्याला या सबसिडीची काहीही आवश्यकता नाही. चळवळ करणाऱ्यांचे सरकार आले तर, त्यांचा प्राधान्यक्रम काय राहील, याचा विचार करून आजच्या आपल्या मागण्या ठरवण्याचा जबाबदारपणा आपण दाखवायला नको का?

मुद्दा हा की, जुने अभिनिवेश, कर्मठ धोरण सोडून व्यवहार्य मागण्या ठरवाव्या लागतील. त्यावर लोकमत संघटित, क्रियाशील करावे लागेल. व्यापक एकजूट साधण्यासाठी किमान सहमतीचे तत्त्व काटेकोर पाळण्याची लवचिकता दाखवावी लागेल.

रेशनव्यवस्था आजन्म ठेवावी, हीही आपली अपेक्षा असता कामा नये. बाजारात वस्तूंची उपलब्धता आणि तिथे सन्मानाने खरेदी करण्याची क्षमता निर्माण करणे, ही आपली दिशा असली पाहिजे. आज विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेत ज्यांच्याकडे क्रयशक्ती नाही, त्यांना न्याय्य मोबदला देणारा रोजगार मिळण्यासाठीचा लढा लढत असतानाच अधिक मोबदला देणाऱ्या रोजगारासाठी आवश्यक ती कौशल्ये त्यांच्यात वृद्धिंगत करून त्यांना सिद्ध करणे गरजेचे आहे.

दैनंदिन जीवनात रेशनची गरज संपणे, ती व्यवस्था केवळ आपत्तिकाळासाठीच ठेवणे, हेच आजच्या रेशनचळवळीचे लक्ष्य असले पाहिजे.

[ लेखक रेशनिंग कृती समितीचे कार्यकर्ते आहेत. रेशनिंग कृती समिती ही रेशनच्या प्रश्नावर काम करणाऱ्या संस्था-संघटनांची समन्वय समिती आहे.]

# गरिबांसाठीचा निधी श्रीमंतांच्या घशात का घालत आहात?

*राजीव साने*

सध्या आपल्या देशात जी स्वस्त धान्य योजना आहे ती वार्षिक एक लाख रु. किंवा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांसाठीच लागू आहे. दारिद्र्यविषयक वाद हा वार्षिक 12 हजार रु. की 36 हजार रु. असा आहे. (अगदी अर्जुनसेन गुप्ताप्रणीत दारिद्र्यरेषा मानली तरी ती वार्षिक 36000 रु.च येते). तेव्हा एक लाख मर्यादेमुळे कोणी गरीब या योजनेपासून वंचित राहण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. असे असूनही ही योजना सर्वच नागरिकांसाठी (अंबानींसकट) लागू करा अशी समतावाद्यांची मागणी आहे. ही योजना गटलक्ष्यी (टारगेटेड) न ठेवता सार्विक (युनिव्हर्सल) करावी यासाठी सनातनवादी मंडळी जी समर्थने देतात त्यांचा समाचार आपण नंतर घेऊच. त्याआधी ही योजना आहे ह्या स्वरूपातच, वित्तीय घातपाताच्या मार्गाने (फिस्कल सॅबोटाज) देशाचा विध्वंस घडवून आणण्यास कशी कारणीभूत ठरू शकते हे आपण समजावून घेतले पाहिजे. तसेच वित्तीय घातपाताकडे नेणाऱ्या इतर काही 'जनवादी' मागण्या, शिफारसी व प्रत्यक्ष कायदे कसा विध्वंस घडवू शकतात ते पाहून त्या प्रकाशात 'सर्वांना स्वस्त धान्य' हे देशाला केवढ्याला पडेल याचा अदमास आपण लावला पाहिजे.

## सध्याची योजनाच अंदाजपत्रकाच्या 60 टक्के बांधिलकी घेते.

सध्याची कार्डधारकांची संख्या व विविध कार्डधारकांना सरकारने कबूल केलेले अनुदानित भाव मालाची (वजने मापे) मात्रा व बाजारभाव लक्षात घेता सध्याच्या योजनेनुसार सरकारने एकूण किती अनुदान देण्याची बांधिलकी घेतली आहे? उत्तर आहे सहा लाख कोटी रु. म्हणजेच अंदाजपत्रकाच्या 60 टक्के. (याची सिद्धता कोष्टक 1 व 2 मध्ये पाहावी). तुम्ही म्हणाल एवढी मोठी तरतूद केली आहे की काय? अजिबात नाही. या योजनेसाठी एकूण खर्चाची तरतूद फक्त 50 हजार कोटी म्हणजे बांधिलकीच्या एक बारांश इतकीच आहे. अन्न महामंडळाच्या केंद्रीकृत कार्यपद्धतीमुळे व 'सरकारीपणामुळे' जो अनुदान पोचवणूक खर्च (डिलिव्हरी कॉस्ट) येतो तो तरतुदीच्या किमान 75 टक्के येतो. म्हणजेच स्वस्त धान्य दुकानांपर्यंत पोहोचणारे अनुदान 12 हजार कोटीच असते. लायसन्सधारक रेशनदुकानदार त्यांपैकी किमान निम्मे हडप करतात व सहा हजार कोटी म्हणजे बांधिलकीच्या 1 टक्के अनुदान लक्ष्य गटापर्यंत पोहोचते.

सरकार ही जादू कशी करते? सरकारला अन्नमहामंडळ आणि रेशनदुकानदार यांच्या अकार्यक्षमतेवर व भ्रष्टतेवर गाढ विश्वास आहे म्हणूनच सरकार बांधीलकी घ्यायची 6 लाख कोटींची व तरतूद करायची फक्त 50 हजार कोटींची ही आत्मविसंगत गोष्ट बिनदिक्कतपणे वर्षानुवर्षे चालू ठेवू शकत आहे. अशी कल्पना करा की समजा उद्या अन्नमहामंडळ व रेशनदुकानदार यांना नैतिकतेचा अटॅक आला किंवा सरकारने बांधिलकी घेतलेले अनुदान थेटपणे लाभार्थींना (कार्डधारकांना) देण्याचे (उदा. फूड स्टॅम्प्स) मान्य केले तर काय होईल? एकतर महसूल दीडपट वाढवावा लागेल किंवा वित्तीय तुटीत राष्ट्रीय उत्पन्नाच्या आणखी 10 टक्के भर घालावी लागेल. 5 टक्के (आहे ह्या) वित्तीय तुटीने महागाईचा आगडोंब उसळला आहे. वित्तीय तूट तिप्पट केल्याने काय परिस्थिती होईल? यालाच मी वित्तीय घातपात (फिस्कल सॅबोटाज) म्हणतो. म्हणजे सध्याची 1 लाख रुपये कमाल उत्पन्न असणाऱ्यांसाठी गटलक्ष्यी (टारगेटेड) योजनाच इतकी विध्वंसकारी आहे. समतावादी आता ती सार्विक (युनिव्हर्सल) करून मागताहेत. त्याने सहालाख कोटीची बांधिलकी किती लाख कोटी बनेल? याविषयी ते काहीच बोलत नाहीत.

## हलवायाच्या रिकाम्या घरावर तुळशीपत्र

समतावाद्यांना त्यांच्या कोणत्याही प्रतिपादनावर 'श्रीमंतांवर कर वाढवा' एवढा एकच मंत्र माहीत असतो. समजा श्रीमंतांना पुरते नागविले तरी महसूल किती वाढवता येईल याचे उत्तर 'अमर्याद' असे देता येणार नसते. करदाता हा प्राणी कितीही ओझे लादले तरी ते घेऊ शकेल अशी एक समजूत असते. प्रत्यक्ष कर हे जर सगळ्याच उत्पन्नाइतके केले तर माणूस मुळात उत्पन्न कशासाठी मिळवेल? अप्रत्यक्ष कर आणि महागाई कर यांचा बोजा तर सर्वच ग्राहकांवर येतो व त्यात गरीबसुद्धा आले. समतावादी संपत्ती ही गोष्ट (उत्पादित करावयाची नसून) फक्त मनसोक्तपणे वाटून टाकण्याची गोष्ट मानतात. ते हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवून रिकामे होतात पण हलवायाचे मुळातच दिवाळे वाजलेले आहे हे त्यांच्या खिजगणतीतच नसते. 'अनंतहस्तें करण्या दानें, देतां किती घेशील दो करानें', असे मानून बिनदिक्कतपणे मागण्या, वचननामे, आयोगांच्या शिफारशी व प्रत्यक्ष कायदे यांची खैरात चालू आहे. महसूल कुठून आणायचा? या प्रश्नाचे उत्तर द्यायला कोणीही तयार नाही. काही उदाहरणे घेऊ.

ज्या स्वामीनाथन साहेबांनी मोठ्या उदारपणे स्वस्त धान्य सार्विक करा ही शिफारस केली तेच साहेब त्याच अहवालात शेतकऱ्यांना किती हमीभाव द्यावेत याचीही भन्नाट शिफारस करतात. शेतकऱ्याला आलेला उत्पादनखर्च (यात स्वतःच्या श्रमाचेही बिल लावायचे आहे) अधिक 50 टक्के इतका हमीभाव शेतकऱ्याला द्यावा.

उत्पादनखर्चावर 50 टक्के एवढा वाढावा (मार्जिन) औषधकंपन्यांना तरी मिळत असेल काय? पण ते काहीही असो. आपण ही शिफारस अंमलात आणायचीच असे ठरवू. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीला फक्त 20 टक्केच वाटा मिळतो असे शेतकऱ्यांच्या संघटना म्हणतात. तसेच हा वाटा मिळूनही शेती ही ना नफा ना तोटा (खरे तर तोटाच, पण सध्या मानू.) तत्त्वावर चालते असाही दावा असतो. म्हणजेच शेती उत्पादनखर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या 20 टक्के आहे. त्यावर 50 टक्के म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाच्या 10 टक्के जादाची तरतूद लागणार.

पुन्हा बजेट दीडपट करावे लागणार. वित्तीय तुटीत आणखी 10 टक्के भर घालावी लागणार. हे करणे म्हणजे वित्तीय घातपातच होय. ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य अशी मागणी करत आहेत की सर्वांना सर्व शिक्षण (के.जी. ते पी.जी.) पूर्णतः निःशुल्क व संपूर्ण सरकारीकरणाद्वारे द्यावे. (पहा पुस्तिकाह्नह्नसमाजवादी अध्यात्म संघ, साने गुरुजी स्मारक पुणे). त्यांच्याच म्हणण्यानुसार आज भारत शिक्षणावर फक्त 3 टक्क्यांपेक्षा कमी खर्च (राष्ट्रीय उत्पन्नाच्या 3 टक्के) सरकारमार्गे करतो. शिक्षणातील खाजगी क्षेत्र दुपटीहून जास्त आहे. म्हणजे हे धरून खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या 9 टक्के आला. शिक्षणवंचितता कमीत कमी 50 टक्के तरी आहेच. (शालेय गळतीच 43 टक्के आहे) म्हणजे भाई वैद्य योजनेचे बिल किमान 18 टक्के होणार. बजेट 20 टक्के आहे. म्हणजे बजेटच्या वर 18-3 (मूळचे) = 15 टक्के जास्त लागणार. बजेटमध्ये वाढ आहे त्याच्या 75 टक्के लागणार. तेवढी वित्तीय तूट वाढवावी लागणार. पण मुळात श्रीमंतांच्या पोरांना सरकारने फुकट उच्च शिक्षण द्यावे हे कशासाठी? त्यांनी सरकारी खर्चात शिकून अमेरिकेला जावे यासाठी? म्हणजे एकाच हलवायाच्या घरावर कितीदा तुळशीपत्रे ठेवायची?

भरमसाठ काहीतरी देऊ करून टाळ्या मिळवणारे, मग ते नेते असोत, आयोग असोत वा खुद्द सरकारे असोत, देशाचा वित्तीय घातपात करून विध्वंस करू पाहात आहेत. समतावाद्यांच्या मते त्यांना गणिताशी काही घेणे देणे नाही कारण त्यांना ही व्यवस्था 'चालवायची' नसून 'उलथवायचीच' आहे.

## ससे, हरणे आणि हत्ती

स्वस्त धान्य योजनेचे सार्विकीकरण मागण्यामागे समतावाद्यांची काही गमतीशीर समर्थने आता पाहू. त्यांच्या मते भारतात खरोखर गरीब कोण हे ठरवणेच अवघड आहे. सशांबरोबर हरणांनाही गणू या कारण हरिणे हेही जवळजवळ ससाच आहे. पण तुम्ही हत्तींनाही तसेच गणूया असे म्हणता आहात. गरीब कोण हे ठरवता येत नसेल पण श्रीमंत कोण हे तरी ठरवता येते की नाही? म्हणजे कमाल मर्यादा घालावीच लागणार. सध्याच्या योजनेत ती एक लाख रु. वार्षिक उत्पन्न ही आहे. 'एक डॉलर गरिबी' हे आंतरराष्ट्रीय मानक लावून पाहू. दरडोई दर दिवशी 50 रु. व 5 माणसांचे कुटुंब धरले तरी 250 रु. रोज होतात. महिन्याचे साडेसात हजार होतात. बारा महिन्यांचे 90 हजारच होतात. एकलाख ही मर्यादा सध्या आहेच. म्हणजे गरीब वगळला जाऊ नये म्हणून सार्विकीकरण हवे हे म्हणणे अजिबात खरे नाही.

काही गरिबांना कायमस्वरूपी निवासी पत्ताच नसल्यामुळे रेशनकार्डच मिळत नाही अशी एक तक्रार आहे. ठीक आहे. त्यांना निवासीच्याऐवजी प्रवासी रेशनकार्डे देऊ. एक लाखांच्या वरच्यांना गरीब ठरवण्याने हा निवासी किंवा प्रवासी प्रश्न कसा काय सुटतो?

आणखी प्रतिपादन असे की मध्यमवर्ग रेशनिंगमध्ये आला की त्याच्या ताकदीमुळे व लढाऊ वृत्तीमुळे सर्वच कार्डधारकांच्या लढ्याला बळ येईल. पण समतावाद्यांच्या मते



हाच मध्यमवर्ग अप्पलपोटा व असंवेदनशील आहे ना? मग तो कशाला आवाज उठवील? अगदी एक लाखाच्या खालीसुद्धा केशरीवाले पिवळेवाल्यांचे रेशन लाटताहेत अशी वस्तुस्थिती आहे. रेशन दुकानदाराला लाच देणे हे केशरीवाल्याला पिवळेवाल्यापेक्षा जास्त सोपे जाते. आता त्यात तुम्ही पांढरेवाल्यांनाही घालायला निघालात. क्रॉस सबसिडीचा परिणाम साधायचा असेल तर योजना वरच्यांना सक्तीची बनवावी लागते. योजना सर्वांना खुली करून पुरणार नाही तर सक्तीची करावी लागेल. म्हणजेच अन्नक्षेत्रातून खाजगी व्यापाऱ्याचे पूर्ण उच्चाटन करावे लागेल. सर्व शेतीमाल सक्तीने लेव्हीचा बनवावा लागेल. हे करणार काय?

सरकारला मात्र गरीब कोण हे ठरविण्याचा चोख मार्ग सापडला आहे. सरकारचे जावई कर्मचारी व जावई एजंट (लायसन्सवाले) यांच्या जाचाला तोंड देऊनही जो लायनीत उभा राहतो तो नक्की गरीबच असतो. त्यांची संख्या एक बारांशपेक्षा कमी आहे. म्हणूनच सरकार एकबारांश टक्के तरतूद करून निवांत बसले आहे.

## कमी द्या पण अंमलबजावणी चोख करा

कोणताही सरकारी हस्तक्षेप मग एखादा कायदा असो, योजना असो, वा उपक्रम हा लाभार्थींना किंवा त्यांची वकिली करणाऱ्या राजकारण्यांना भरघोस वाटला पाहिजे अशी एक निकड राजकारण्यांना भासत असते त्या भरात ते अतिवचनबद्धतेची चूक करतात. अशक्य कोटीतील गोष्ट कबूल करून बसल्यामुळे व ही गोष्ट लपवायची असल्यामुळे अंमलबजावणीचे तीन तेरा कसे वाजवता येतील? एवढाच मार्ग त्यांच्याकडे उरतो. अंमलबजावणीत अडथळ्यांची शर्यत उभी करावी लागते. नोकरशाहीतील कर्मचारी, कामे करून देणारे कार्यकर्ते (दलाल) आणि खुद्द राजकारणी यांच्याकडे अडथळ्याच्या शर्यतीत कोणाची नैया किती पार लावायची याचे मर्जीनुसार निर्णय घेण्याची सत्ता तयार होते. यातून भ्रष्टाचार, गुन्हेगारी व आश्रयनिष्ठा (मेंटॉर वॉर्ड) संबंधांची साखळी तयार होते. हे राजकीय जीवनाचे नासलेपण होय. 'अधिकृत' आणि 'प्रत्यक्षात' यात अंतर जितके जास्त तितके हे नासेलपण जास्त. राजकीय जीवनाचे नासलेपण ही फार मोठी किंमत आहे. ती पैशात मोजता येत नाही. पण खुद्द लोकशाहीच धोक्यात आणणारी किंमत आहे. त्यामुळे नेहमीच जबाबदार नेतृत्त्वाचे (राजकीय, स्वयंसेवी, पत्रकारिता, विद्यापीठीय) कर्तव्य आहे की असा आग्रह धरावा की 'कमी द्या पण अंमलबजावणी चोख करा'. समतावादी नेमके उलटे करतात.

*पत्ता*

□□

# भ्रष्ट, अकार्यक्षम रेशनव्यवस्थेला ठोस पर्याय

*मिलिंद मुरुगकर*

दारिद्र्यनिर्मूलन हा या देशापुढील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे असे जर आपण मानणार असू तर देशातील गरीब ग्राहक व गरीब शेतकरी यांच्या हितसंबंधांची परस्परपूरक अशी सांगड घालण्याचा प्रश्न देशापुढील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न ठरेल. आजची व्यवस्था दुर्दैवाने नेमके याच्या उलट करते. आजची रेशनव्यवस्था गरीब ग्राहक व गरीब शेतकरी यांना परस्परांविरुद्ध उभे करते. गरीब ग्राहकाची अन्नसुरक्षा साधण्याच्या नावाखाली गरीब धान्योत्पादक शेतकऱ्यांचे शोषण करून ग्रामीण दारिद्र्यनिर्मूलनाच्या प्रक्रियेत अडथळा आणते आणि दुसरीकडे प्रत्यक्षात गरीब ग्राहकाची अन्नसुरक्षा तर साधली जात नाहीच. उलट महागाईच्या दुष्टचक्रात देशातील गरीब ग्राहक अक्षरशः भरडून निघत आहेत.

देशातील गरीब ग्राहक व शेतकरी यांच्यामधील या व्यवस्थेने उभी केलेली ही लढाई संपवण्याचा, गरिबांची अन्नसुरक्षा साधण्याचा व ग्रामीण दारिद्र्यनिर्मूलनाला गती देण्याचा ठोस प्रभावी उपाय आज आपल्यासमोर उपलब्ध आहे. तो उपाय म्हणजे स्मार्ट कार्डस् अथवा फूड स्टॅम्प्स्.

## स्मार्ट कार्डस् म्हणजे काय?

सध्याच्या रेशनव्यवस्थेत सरकार रेशन दुकानातून गरिबांना स्वस्तात धान्य देते म्हणजे त्यांना धान्यखरेदीसाठी अनुदानच देत असते. समजा धान्याची बाजारातील किंमत 11 रुपये किलो इतकी असेल व गरिबांना ते धान्य स्वस्त धान्य दुकानातून 5 रुपये किलो या दराने द्यावयाचे असेल तर त्यांना प्रती किलो 6 रुपये (11-5) इतके अनुदान द्यायला हवे. स्मार्ट कार्डसच्या पर्यायात गरीब कुटुंबांना द्यावयाचे एकूण अनुदान (सबसिडी) थेटपणे त्यांच्या स्मार्टकार्डवर जमा होईल. गरीब जनता या स्मार्ट कार्डचा कोणत्याही रजिस्टर्ड किराणा मालाच्या दुकानातून वापर करतील. ते जितक्या किंमतीचे धान्य खरेदी करतील तितकी रक्कम त्यांच्या स्मार्टकार्डवरून वळती केली जाईल. सध्या देशातील बरीचशी जनता क्रेडिट कार्डस्चा अशाप्रकारे वापर करत आहे.

देशाच्या दुर्गम भागात जर स्मार्ट कार्डसची व्यवस्था लागू करणे अशक्य असेल तर तेथे फूड स्टॅम्प्स्चा पर्याय वापरता येईल. फूड स्टॅम्प्स् म्हणजे धान्य खरेदीसाठी गरीब ग्राहकांना दिलेले कॅश व्हाऊचर्स. अन्नासाठीचे अनुदान म्हणून हे फूड स्टॅम्प्स् सरकार गरिबांना देईल. उदा. गरीब ग्राहकाकडे समजा 50 रुपयांचे फूड स्टॅम्प्स् आहेत. तो 70 रुपयांचे धान्य खरेदी करणार असेल तर 50 रुपयांचे फूड स्टॅंम्प्स व उरलेले 20 रुपये रोख देऊन तो ग्राहक हे धान्य खरेदी करू शकेल. किराणा दुकानदार फूड स्टॅम्प्स् ठराविक बॅंकेत अथवा पोस्ट ऑफिसमध्ये जमा करून त्याचे पैशात रूपांतर करेल.



स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स् या पर्यायांमध्ये 'रेशन' दुकानांची आवश्यकता नाही. कोणत्याही नेहमीच्या किराणा दुकानातून गरीब जनता धान्य खरेदी करू शकेल.

## रेशनव्यवस्थेची परिणामकारकता

* महाराष्ट्रातील ग्रामीण भागात दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकांपैकी 47% लोक व शहरी भागातील दारिद्र्यरेषेखाली 76% लोकांना रेशनव्यवस्थेपासून कोणताही लाभ मिळत नाही.
* देशाच्या पातळीवर ग्रामीण भागातील गरीब जनतेच्या जेवणातील एकूण धान्यापैकी फक्त 19% धान्य रेशनमधून मिळते. शहरी भागात हे प्रमाण 18% पेक्षाही कमी आहे. म्हणजे गरिबांसाठीच्या धान्याची उपलब्धता खुल्या बाजारातूनच होत आहे. त्यामुळे त्यांच्यासाठीचे धान्याचे अनुदानही बाजारपेठेच्या माध्यमातून पोहोचवणे योग्य ठरेल. त्यासाठी हा स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्चा उपाय आहे.

(संदर्भ : -- *NSS Consumption Survey 2004-05*)

## स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्चे फायदे

### फायदा क्र.1 : कार्यक्षमता

यात गरिबांसाठी धान्य पोहोचवण्यासाठी बाजारपेठेच्या कार्यक्षमतेचा वापर केला जाईल. इतर ग्राहक ज्या ठिकाणांहून धान्य खरेदी करतील त्याच दुकानातून लाभार्थी स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्च्या सहाय्याने धान्य खरेदी करू शकतील. त्यांना रेशन दुकानदारांच्या मक्तेदारीचा जाच सहन करावा लागणार नाही. इतकेच नाही तर सध्याचे रेशन दुकानदारही या व्यवस्थेत सहभागी होऊ शकतील.

ग्राहकाला धान्याच्या निवडीचे स्वातंत्र्य असेल. आज रेशनमधून पुरवले जाणारे निकृष्ट प्रतीचे धान्य विकत घेण्याशिवाय दुसरा उपाय गरीब ग्राहकांजवळ नसतो. स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्च्या व्यवस्थेत एखाद्या दुकानातील धान्याची प्रत खराब असेल तर दुसऱ्या किराणा मालाच्या दुकानात जाण्याचा पर्याय ग्राहकापुढे असेल. यामुळे आपले ग्राहक दुसरीकडे जाऊ नये यासाठी दुकानदारांमध्येही स्पर्धा राहील, ज्याचा फायदा ग्राहकाला होईल व त्याला चांगल्या दर्जाचे धान्य मिळेल.

आज रेशनसाठी आलेले धान्य अनेकदा खुल्या बाजारात बेकायदेशीरपणे विकले जाते. चांगले धान्य तर हमखास अशाप्रकारे खुल्या बाजारात विकले जाते. स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स् असल्यास हा गैरव्यवहार होऊच शकणार नाही.

### फायदा क्र.2 : ग्राहकाची सोय

रेशन दुकानाची वेळ, ठिकाण अशा अनेक गोष्टी ग्राहकाच्या सोयीच्या नसतात. नवीन व्यवस्थेत त्या टाळता येतील.

रेशनवरील धान्याचा कोटा एकदम घेण्याइतके पैसे गरीब ग्राहकांकडे नसतात. त्यामुळे आजच्या व्यवस्थेत त्यांना ठराविक हप्त्यातच धान्य घ्यावे लागते. आज रेशनवर महिन्यातून केवळ दोन वेळाच ते धान्य घेता येते. स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्पच्या या व्यवस्थेत ही अडचण दूर होईल. उदा. एखाद्या कुटुंबाकडे 50 रुपयांचे स्टॅम्प्स् असतील तर एकावेळी 5 रुपयांच्या स्टॅम्प्स्चा वापर करून ते दहा वेळा धान्य खरेदी करू शकतील. स्मार्ट कार्डच्या बाबतीत तर कितीही वेळा धान्य खरेदी करता येईल.

## फायदा क्र.3 : दुकानदारांची मक्तेदारी संपेल

सध्याच्या व्यवस्थेत रेशन दुकानदारांच्या मक्तेदारीचा ग्राहकांना त्रास सहन करावा लागतो. बऱ्याचदा दुकान बंद असते. दुकानदार देईल त्या प्रतीचे धान्य गरिबांना निमूटपणे घ्यावे लागते. धान्य ठराविक दुकानातूनच मिळणार असते, म्हणून आपण चांगल्या दर्जाचे धान्य ठराविक प्रमाणात ग्राहकाला दिले नाही तर ग्राहक दुसरीकडे जाऊ शकतो याची चिंताच या रेशन दुकानदाराला नसते उलट गिऱ्हाईक धान्य घ्यायला न आल्यास जास्त चांगले, कारण ते धान्य खुल्या बाजारात जास्त किंमतीने विकता येते अशीच बहुतेक रेशनदुकानदारांची धारणा असते. या उलट स्मार्ट कार्डस् व फूड स्टॅम्प्स्च्या व्यवस्थेत दुकानदारांची अशी मक्तेदारी नसेल कारण रेशन दुकान नावाची गोष्टच नसेल. गरीब ग्राहकांना आपल्या धान्याची खरेदी आपल्या विभागातील कोणत्याही रजिस्टर्ड किराणा दुकानातून करता येईल. या किराणा दुकानदाराचा प्रयत्न आपल्याकडे जास्तीत जास्त गिऱ्हाईक यावे असाच असेल. दुकानदारांमधील स्पर्धेचा फायदा गरीब नसलेल्या ग्राहकांना जसा चांगला माल मिळण्याच्या स्वरूपात होतो तसा तो गरीब ग्राहकांना होईल. गरीब ग्राहकांची क्रयशक्ती स्मार्ट कार्डस् व फूड स्टॅम्प्स्मुळे थेटपणे वाढलेली असल्यामुळे दुकानदाराच्या दृष्टीने इतर ग्राहक व गरीब ग्राहक हे एकाच पातळीवर असतील.

## फायदा क्र.4 : शेतकऱ्यांचे हित

स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्च्या पर्यायात केवळ गरीब जनतेला अन्नासाठीचे अनुदान मोठ्या प्रमाणात व प्रभावी पद्धतीने पोहचवण्याची क्षमता आहे, एवढेच नाही तर या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांचे होत असलेले शोषणही थांबवता येईल व ग्रामीण दारिद्र्यनिर्मूलनाचा वेगही वाढवता येईल. सुरुवातीला धान्याच्या भावाचा ग्रामीण दारिद्र्यनिर्मूलनाशी असलेला संबंध लक्षात घेऊ.

धान्याचे भाव जर किलोमागे एक-दोन रुपयांनी जरी वाढले तरी ग्रामीण अर्थव्यवस्थेत काही हजार कोटींची भर पडते. धान्याच्या किंमती जर किफायतशीर राहिल्या तर शेतकऱ्याला शेतीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहन लाभते. शेतीविकासामुळे जेव्हा शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते तेव्हा एकंदर ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारते. शेतीविकासामुळे वाढलेल्या क्रयशक्तीचा परिणाम म्हणून स्थानिक उत्पादनांना मागणी वाढते.



यातून रोजगारनिर्मिती होते. ग्रामीण भागातील मजूर, व्यापारी, स्थानिक कारागीर, दुकानदार या सगळ्यांना शेतीमधील वाढीव मिळकतीचा फायदा होतो. अर्थात धान्याच्या वाढलेल्या भावामुळे ही सर्व प्रक्रिया घडायला काही कालावधी लागतो.

पण धान्याचे भाव वाढले तर त्याचा मोठा फटका शहरी व ग्रामीण गरीब जनतेला सहन करावा लागतो. आजही देशातील खूप मोठी लोकसंख्या अर्धपोटी राहते हे सत्य आहे. लहान मुलांच्या कुपोषणाची समस्याही देशाच्या अनेक भागात अतिशय तीव्र आहे. या सर्वांनाच धान्याच्या वाढलेल्या किंमतीची मोठी झळ बसते. म्हणजे दूरगामी दृष्टिकोणातून पाहिल्यास धान्याचे भाव वाढलेले असणे हे ग्रामीण दारिद्र्यनिर्मूलनासाठी आवश्यक आहे. पण दारिद्र्यनिर्मूलनाची ही प्रक्रिया घडण्यास काही कालावधी लागतो. त्याआधीच्या टप्प्यात वाढत्या किमतीमुळे गरिबांची परिस्थिती आणखी खालावते. त्यामुळे सरकारचा कल धान्याच्या किमती वाढू न देण्याकडे असतो. विविध मार्गांने बाजारपेठेत हस्तक्षेप करून सरकार अनेकदा धान्याचे भाव पाडते. निर्यातबंदी हा एक प्रमुख मार्ग सरकार वापरते. त्याचबरोबर देशांतर्गत धान्य वाहतुकीवर निर्बंध आणून धान्याचे भाव कमी राहतील असेही सरकार पाहते. हे धोरण शेतकऱ्यांचे शोषण करणारे धोरण आहे. पण गरिबांचे महागाईपासून संरक्षण करणारी प्रभावी व्यवस्था अस्तित्वात नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या या शोषणाला एक तात्त्विक अधिष्ठानही मिळते. केवळ राजकीय अपरिहार्यता म्हणून नव्हे तर मानवतेच्या दृष्टिकोणातूनदेखील बाजारपेठेत हस्तक्षेप करून धान्याचे भाव पाडणे अपरिहार्य ठरते. शेतकऱ्यांच्या संघटनांनी आजवर मोठी आंदोलनेही उभारली पण दुर्दैवाने कोणीही गरीब ग्राहकाचा विचार केला नाही त्यामुळे या आंदोलनांना गरीब ग्राहकाची साथ लाभली नाही.

सध्याच्या रेशनव्यवस्थेमार्फत सरकार देऊ करत असलेले अनुदान मुळातच खूप कमी आहे आणि प्रत्यक्षात भ्रष्टाचारामुळे या तुटपुंज्या अनुदानापैकी थोडाच भाग गरिबांपर्यंत पोहचतो. याऐवजी स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्मार्फत गरिबांचे अनुदान त्यांना आजच्यापेक्षा कितीतरी अधिक व थेटपणे देण्यात आले तर गरिबांना महागाईपासून प्रभावी संरक्षण मिळेल. अशा परिस्थितीत मग निर्यातबंदीसारखे उपाय लादून धान्याचे भाव पाडण्याची गरजच शिल्लक राहाणार नाही.

वास्तविक पाहता विकसनशील देशातील गरीब ग्राहक व शेतकरी यांचे हितसंबंध एकमेकांना पूरक असतात. गरीब ग्राहकाची क्रयशक्ती जेव्हा वाढते तेव्हा धान्याची मागणी वाढते. त्यामुळे धान्याचे भाव वाढून शेतकऱ्यांना याचा फायदा होतो. गरिबांची क्रयशक्ती आणखी वाढली तर त्यांच्या आहारात भाजीपाला, फळे, दूध यांचे प्रमाण वाढते व या सर्व पदार्थांच्या मागणीत वाढ झाल्याने त्याचा फायदा शेतकऱ्यांना होतो. त्यामुळे देशातील गरीब ग्राहकांना अन्नासाठी जास्तीत जास्त अनुदान मिळणे हे शेतकऱ्यांच्या हिताचे असते. अमेरिकेतील अन्नपदार्थाच्या एकूण खपापैकी 20% खप हा फूड स्टँम्प्स्मार्फत होतो. फूडस्टँम्पस्मधून गरिबांना मिळणारे अनुदान वाढावे यासाठी तेथील शेतकऱ्यांचा सरकारवर

दबाव असतो. स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्च्या पर्यायांच्या अंमलबजावणीमुळे आपल्याकडेदेखील गरीब ग्राहक व शेतकरी यांच्या हितसंबंधांची परस्परपूरक सांगड घालता येईल.

**फायदा क्र.5 : कोरडवाहू शेतकऱ्यांना न्याय**

महाराष्ट्रातील गरीब, कोरडवाहू शेतकऱ्यांनाही स्मार्ट कार्डची व्यवस्था फायद्याची आहे. सध्याची रेशनव्यवस्था महाराष्ट्रातील गरीब कोरडवाहू शेतकऱ्यांवर मोठा अन्याय करणारी आहे. या व्यवस्थेमधून राज्यातील गरीब जनतेला होणारा गहू व तांदळाचा पुरवठा म्हणजे राज्यातील शेतकऱ्यांवरील अन्याय डंपिंगच आहे.

'डंपिंग' हा शब्द आंतरराष्ट्रीय व्यापारासंदर्भात वापरला जातो. सरकारी मदत घेऊन एखाद्या देशातील उत्पादक आपला माल दुसऱ्या देशात कमी दरात विकत असेल तर ते अशी मदत न मिळणाऱ्या दुसऱ्या देशातील त्या पदार्थाच्या उत्पादकावर 'डंपिंग' ठरते. असेच 'डंपिंग' महाराष्ट्रातील ज्वारी, बाजरीच्या उत्पादकांवर रेशनमधून स्वस्तात विकल्या जाणाऱ्या गहू व तांदळामुळे होते.

महाराष्ट्रातील गरीब ग्राहकाची पसंती कोरडवाहू शेतीत पिकणाऱ्या ज्वारी बाजरीसारख्या धान्याला असताना रेशनमधून मात्र स्वस्त गहू-तांदळाचा पुरवठा करून आपण महाराष्ट्रातील ग्राहकाची पसंती कृत्रिमरीत्या गहू-तांदळाकडे वळवली. ज्वारी, बाजरी, नागली, वरई या स्थानिक धान्यांचे भाव पाडले. आदिवासी पट्ट्यातील लोकांचे अन्न नागली, वरई हेच आहे.

सिंचनाचा अभाव असताना प्रतिकूल परिस्थितीत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी त्यांच्यावर हे अन्याय्य डंपिंग आपण वर्षानुवर्षे लादत आलो. आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रगत देशांच्या डंपिंगबद्दल तारस्वरात बोलायचे; मग आपल्या देशात चाललेले हे डंपिंग कधी थांबवणार?

इथे कोणी असा प्रश्न उपस्थित करू शकेल की रेशनव्यवस्था भ्रष्टाचाराने पोखरली गेली असल्याने बहुतांश धान्य गरिबांपर्यंत पोहचतच नाही, कारण ते खुल्या बाजारात जाते. मग डंपिंगचा मुद्दा अप्रस्तुत ठरत नाही का? याचे उत्तर 'नाही' असे आहे. कारण धान्य जरी गरिबांपर्यंत पोहचत नसले तरी महाराष्ट्रातील बाजारपेठेत ते स्वस्त दराने शिरकाव करत असल्याने त्याचा विपरीत परिणाम ज्वारी, बाजरीच्या किंमतींवर होतोच.

दुसरा प्रश्न असा विचारला जाऊ शकतो की आजही गरीब ग्राहकाची पसंती ज्वारी बाजरीसारख्या स्थानिक धान्यांना आहे का? याचे उत्तर आपल्याला सोबत जोडलेल्या तक्त्यांमधून मिळू शकते. ही माहिती 2004-2005 च्या नॅशनल सँपल सर्व्हेमधून मिळविलेली आहे. हे आकडे महाराष्ट्रातील जनतेच्या आहारातील ज्वारी, बाजरीसारख्या भरड धान्याचा खप दाखवतात.



**रोजच्या आहारात भरड धान्याचा वापर**

| | सर्वांत गरीब जनता | मध्यम परिस्थितीतील जनता | सर्वांत वरच्या स्तरातील जनता |
|---|---|---|---|
| एकंदर धान्याच्या खरेदीतील भरड धान्याचे प्रमाण | 48% | 38% | 18% |
| दर महिना दरडोई, भरड धान्याचा वापर (किलो) | 5 | 4 | 3 |

(संदर्भ : *-- NSS Consumption Survey 2004-05*)

यावरून असे सिद्ध होते की आजही महाराष्ट्रात ज्वारी बाजरीला मोठी मागणी आहे. महाराष्ट्रातील सिंचनव्यवस्थेचा कमाल विस्तार झाला तरी महाराष्ट्रातील मोठी शेती ही कोरडवाहू धान्य उत्पादनात असणार आहे. त्यामुळे ज्यांना ग्रामीण महाराष्ट्रातील दारिद्र्यनिर्मूलनाची काळजी आहे त्यांनी कोरडवाहू धान्य उत्पादक शेतकऱ्यांचा विचार केंद्रस्थानी ठेवायला हवा. त्यामुळे त्यांच्यावरील डंपिंग थांबवून त्यांच्या मालाला किफायतशीर किंमती मिळवून देणाऱ्या व्यवस्थेकडे आपण गेले पाहिजे. ती व्यवस्था म्हणजेच स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्ची व्यवस्था. कारण त्यामुळे महाराष्ट्रातील गरीब ग्राहकाची क्रयशक्ती थेटपणे वाढवली जाईल. त्याचा परिणाम म्हणून ज्वारी-बाजरीची मागणी वाढेल व त्याचा फायदा या धान्याच्या वाढीव किंमतीद्वारे शेतकऱ्यांना होईल.

महाराष्ट्रात स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्मुळे दरवर्षी साधारण 5 लाख टन धान्याची अतिरिक्त मागणी तयार होईल. त्यातील मोठी मागणी ज्वारी बाजरीसारख्या स्थानिक धान्याला असेल. या मागणीमुळे या धान्यांच्या किंमतीत वाढ होईल व त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होईल.

**फायदा क्र.6 : व्यापक हित शक्य**


एकदा स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स् यंत्रणा सुरू झाली की त्यामध्ये गर्भवती व स्तनदा स्त्रियांसाठी दूध, डाळी यांसारख्या इतर पदार्थांचाही समावेश करून अन्नसुरक्षा-व्यवस्था वाढवता येईल. त्यांची मागणी वाढल्याने त्याच्या उत्पादकांनाही त्याचा फायदा होईल.

**केरोसीन विनात्रास मिळेल**

या व्यवस्थेत केरोसिनच्या अनुदानाचाही समावेश करता येईल. अन्नधान्यासोबतच रेशन दुकानातून मिळणारे केरोसीन गरिबांची इंधनाची मोठी गरज भागवते. मात्र, त्यातही मोठ्या प्रमाणात होणाऱ्या काळ्या बाजारामुळे गरीब जनता त्रस्त आहे. हे या पर्यायी व्यवस्थेमुळे टाळणे शक्य होईल.

## महाराष्ट्रातील गरिबांना मिळणारे अन्नाचे अनुदान

सरकार गरिबांना देत असेल्या अन्नाच्या अनुदानापैकी किती अनुदान गरिबांपर्यंत पोहोचते हे बघणे गरजेचे आहे. या अनुदानातील शंभर रुपयांची वाटणी अशी होते...




या शंभर रुपयांपैकी 28 रुपये खुल्या बाजारातील अवैध विक्रीमुळे वाया जातात. त्यामुळे अनुदानाचा लाभ भ्रष्ट व्यवस्थेला होतो. 16 रुपये शासकीय अकार्यक्षमतेमुळे वाया जातात. 31 रुपयाचे अनुदान गरीब नसलेल्यांना मिळते आणि खरोखर गरीब असलेल्यांपर्यंत फक्त 25 रुपयाचे अनुदान पोहोचते.

(संदर्भ : -- *NSS Consumption Survey 2004-05*)

## सर्वसाधारण शंका

खरे तर आजची आपली तंत्रवैज्ञानिक क्षमता पहाता देशभर स्मार्ट कार्डसची योजना लागू करणे सहज शक्य आहे. ज्या ठिकाणी विद्युत पुरवठा नियमित नाही त्या ठिकाणी बॅटरीवर चालणारी मशिन्स उपलब्ध आहेत. पण तरीही जर काही कारणांमुळे देशाच्या दुर्गम भागात स्मार्ट कार्डस्चा पर्याय वापरणे शक्य नसेल तरच फूड स्टँम्प्स्चा पर्याय वापरावा लागेल. या बाबत अनेकांच्या मनात काही शंका निर्माण होऊ शकतात. त्या संभाव्य शंकांचे निराकरण करण्याचा प्रयत्न खाली केला आहे.

**शंका-1 :** वाढत्या महागाईमुळे स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्मधून कमी लाभ मिळेल.

**उत्तर :** स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्च्या किंमती महागाई निर्देशांकाशी जोडल्यास हे टाळता येईल. महागाई ज्या प्रमाणात वाढेल त्या प्रमाणात स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्ची किंमत वाढवली जाईल. त्यामुळे त्यापासून मिळणारा लाभ कमी होण्याचा प्रश्नच नाही.

**शंका-2 :** स्मार्ट कार्डच्या व्यवस्थेतून काही गरीब वगळले जाण्याचा धोका आहे.

**उत्तर :** अन्नसुरक्षा व्यवस्थेचे लाभार्थी कोण असतील व ते कसे ठरवले जावेत हा वेगळा विषय आहे. आज रेशनव्यवस्थेतून ज्यांना सुरक्षेचा लाभ होत आहे ते सर्व लाभार्थी या व्यवस्थेचे लाभार्थी असतील. त्यामुळे हा धोका उद्भवणार नाही. स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्ची व्यवस्था धान्य कोणाला मिळावे हे ठरवणार नाही, तर जे आजचे लाभार्थी आहेत, त्यांच्यापर्यंत अन्नाचे अनुदान थेटपणे कसे पोहोचेल याची शाश्वती देणारी आहे.



**शंका-3 :** अन्न तुटवडा असणाऱ्या भागात खाजगी व्यापारी धान्य नेणार नाहीत.

**उत्तर :** आजही गरिबांना लागणाऱ्या एकूण अन्नापैकी रेशनद्वारे फारच कमी अन्नाची गरज पूर्ण होते. उरलेल्या धान्याची गरज पूर्ण करण्यासाठी देशातील सर्व गरीब खाजगी व्यापाऱ्यांवरच अवलंबून आहेत.

**शंका-4 :** खाजगी दुकानदाराची मक्तेदारी निर्माण होईल.

**उत्तर :** दुर्गम भागात खाजगी दुकाने कमी असल्याने ही शक्यता कमी आहे. आजही अशा ठिकाणी दुकानदारांची मक्तेदारी आहे व त्याचा फटका गरिबांना बसत आहे. स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्मुळे ही परिस्थिती सुधारू शकते, कारण या व्यवस्थेत गरीब ग्राहकांना एकाच दुकानदारावर अवलंबून राहावे लागणार नाही, तर त्यांना दुकाननिवडीचे स्वातंत्र्य असेल.

**शंका-5 :** स्मार्ट कार्ड लाभार्थींपर्यंत पोहोचणार नाहीत.

**उत्तर :** स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्ची माहिती लोकांपर्यंत पोहोचल्यावर त्याचे फायदे लक्षात घेता, स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स् मिळण्याच्या मागणीसाठी लोकांकडून व्यवस्थेवर दबाव आणता येईल. आजच्या व्यवस्थेत रेशन-दुकानदाराचा भ्रष्टाचार, दुकान उघडण्यातील अनियमितता व धान्याचा निकृष्ट दर्जा या विरोधात एकत्र येऊन व्यवस्थेवर दबाव आणणे तुलनेने कठीण आहे.

शिवाय फूड स्टॅम्प्स्वर नंबर देऊन भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा उभारणे शक्य आहे. उदा. सिन्नर तालुक्यातील दापूरे गावातील लोकांसाठी फूड स्टॅम्प्स्वर त्याचा उल्लेख असणारा कोड असेल व ते कोणत्या बँकेत किंवा पोस्ट ऑफिसमध्ये जमा झाले याचीही नोंद सरकारकडे असेल. प्रत्यक्ष धान्याची गळती शोधण्यापेक्षा फूड स्टॅम्प्स्ची गळती शोधणे तुलनेने सोपे आहे.

**शंका-6 :** बनावट फूड स्टॅम्प्स् छापले जातील!

**उत्तर :** फूड स्टॅम्प्स् चलनी नोटांप्रमाणे सरकारच्या सिक्युरिटी प्रेसमध्ये छापता येतील. बनावट फूड स्टॅम्प्स् छापले जाण्याचा धोका वाटू शकतो पण पाचशे, हजार याच्याच बनावट नोटा तयार केल्या जातात, कारण त्याच्या छपाईसाठी लागणारा खर्च मोठा असतो. कमी किंमतीच्या नोटा बनावट म्हणून छापणे परवडत नाही. हे गणित कमी किंमतीच्या फूड स्टॅम्प्स्साठीही लागू असल्याने हा धोका नाही. शिवाय फूड स्टॅम्प्स् स्टॅम्प्स्पेपरप्रमाणे फार काळ चलनात राहू शकत नाहीत, ते एका चक्रात सरकारकडे परत येतील. त्यामुळे काही गैरव्यवहार झालाच तरीही तो लगेचच उघडकीस आणणे शक्य आहे.

**शंका-7 :** गरीब त्यांच्याकडचे स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स् इतर गोष्टींसाठी विकतील.

**उत्तर :** गरजू गरीब असे करणार नाहीत. स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स् लाभधारक गरीब नसेल तर असे होऊ शकेल. दारूसाठी फूड स्टॅम्प्स् विकले जाण्याची शक्यता आहे. पण, फूड स्टॅम्प्स् स्त्रियांना दिल्यास तो धोकाही टाळता येणे

शक्य आहे.

**शंका-8 :** खाजगी किराणा दुकानदार फूड स्टॅम्प्स्चा स्वीकार करतील का?

**उत्तर :** दुकानदाराला नेहमीच आपल्या मालाचा खप वाढवण्यात रस असतो. त्यामुळे आपले ग्राहक वाढवण्यासाठी तो सतत प्रयत्न करत असतो. फक्त त्याला पैशात रूपांतर करण्यास त्रास झाला तर तो ती फूडस्टॅम्प्स् स्वीकारण्यास टाळाटाळ करण्याची शक्यता आहे. ते टाळण्यासाठी ती यंत्रणा कार्यक्षम करता येईल. आजच्या व्यवस्थेत गरीब ग्राहक येऊ नये असाच रेशन दुकानदाराचा प्रयत्न असतो, जेणेकरून तेच धान्य तो खुल्या बाजारात वळवू शकेल.

**शंका-9 :** स्मार्ट कार्ड/फूड स्टॅम्प्स्चे लाभधारक धान्याऐवजी अन्य वस्तू खरेदी करतील.

**उत्तर :** हा प्रश्न सध्याच्या रेशनव्यवस्थेबाबतही लागू आहे. या दोन्ही व्यवस्थांचा उद्देश गरीब ग्राहकांची क्रयशक्ती वाढवणे हाच आहे. फूड स्टॅम्प्स्च्या व्यवस्थेत तो थेटपणे साध्य होईल. आजचा गरीब ग्राहक त्याला लागणाऱ्या एकूण धान्यापैकी काही धान्य रेशनमधून खरेदी करतो तेव्हा त्याचे पैसे वाचवत असतो. या वाचलेल्या पैशाचा उपयोग तो धान्याव्यतिरिक्त इतर वस्तूंच्या खरेदीसाठी करत असतोच. त्यामुळे स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स्च्या सहाय्याने धान्याव्यतिरिक्त इतर वस्तू खरेदी करणे काय किंवा पैसे वाचवून इतर वस्तू खरेदी करणे काय यात गुणात्मक फरक काहीच नाही.

**शंका-10:** स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स् सांभाळून ठेवणे गरिबांसाठी कठीण होईल.

**उत्तर :** गरिबांच्या एकूण मिळकतीच्या फक्त 10% किंमत फूड स्टॅम्प्स्ची असणार आहे. गरीब त्यांची 90% मिळकत नोटांच्या रूपात सांभाळू शकतात. तर स्मार्ट कार्ड वा फूड स्टॅम्प्स् का नाही सांभाळू शकणार?

लवकरच केंद्र सरकार गरिबांची अन्नसुरक्षा हा एक मूलभूत अधिकार ठरवणारे विधेयक संसदेत मांडणार आहे. या विधेयकाद्वारे प्रत्येक गरीब कुटुंबाला महिन्याला 25 किलो धान्य 3 रु. दराने मिळण्याचे आश्वासन देण्यात येणार आहे. परंतु आजची रेशनव्यवस्था भ्रष्टाचाराने इतकी सडलेली आहे की हे धान्य गरिबांपर्यंत पोहोचण्याऐवजी ते मोठ्या प्रमाणावर खुल्या बाजारात विकले जाणे अपरिहार्य आहे. फूड स्टॅम्प्स्, स्मार्ट कार्डस् यांसारख्या अनुदान थेटपणे पोहोचवणाऱ्या पर्यायाची तातडीने अंमलबजावणी हाच यावरचा प्रभावी उपाय आहे. या पयार्यांचे पथदर्शी प्रकल्प राज्यसरकारांनी हाती घेतल्यास केंद सरकार ह्याचा सर्व खर्च करेल असे माजी केंद्रीय अर्थमंत्री चिदंबरम यांनी वारंवार आवाहन करूनदेखील राज्यांनी त्याला प्रतिसाद दिलेला नाही. याचे एकमेव कारण म्हणजे सध्याच्या रेशनव्यवस्थेतील भ्रष्ट हितसंबंधांना या पर्यायांमुळे पोहचणारा धोका. या हितसंबंधांना मोडून पुढे जायचे असेल तर गरीब ग्राहक, शेतकरी व संवेदनशील नागरिक यांनी एकत्र येऊन या मागणीसाठी राजकीय दबाव आणणे गरजेचे आहे.

*पत्ता*

□□



# रेशनव्यवस्थेचे पूर्ववत सार्वत्रिकीकरण हवेच

*उल्का महाजन*

गेल्या दीड ते दोन दशकांत भारतामध्ये गरीब, कष्टकरी समूहांसाठी असलेल्या विविध कल्याणकारी, संरक्षणाच्या योजना कोसळू लागल्या आहेत. त्यामध्ये आरोग्य, शिक्षण, रेशन या तीन्ही महत्त्वाच्या क्षेत्रांतील योजनांचा समावेश आहे.

या कोसळण्याच्या घटनांबरोबरच आणखीही काही गोष्टी त्याच वेळी घडत आहेत. त्यांमधला संबंध व तर्कसंगती लक्षात घेत त्यामागचे डाव समजून घ्यायला हवेत.

* गेल्या दशकात विविध सार्वजनिक योजनांचे खाजगीकरण झपाट्याने सुरू झाले. अथवा खाजगीकरणाची टांगती तलवार ठेवून त्या त्या विभागाचे केंद्रीकरण (विशेषतः निधीची तरतूद व निर्णयप्रक्रियेच्या स्तरावर) वाढवण्यात आले.
* रेशनसारख्या योजनेची अर्थसंकल्पीय तरतूद वाढली, पण प्रत्यक्षात रेशनच्या ग्राहकासाठी दर कमी झाले नाहीत, व रेशनची गरज असणारा मोठा समूह रेशनव्यवस्थेच्या बाहेर फेकला गेला.
* गरीब समूहाच्यासाठी असणाऱ्या योजनेकरिता लागणाऱ्या अनुदानात व अनुदानित योजनांमध्ये कपात करण्यासाठी प्रचंड दबाव, परंतु बलाढ्य उद्योगसमूहांना मोकाट करसवलती व विविध रूपांची अनुदाने सढळ हाताने देण्याचा कल वाढला.
* सर्व सार्वजनिक योजनांमधून बोलका मध्यमवर्ग बाहेर फेकला गेला, त्यांपैकी काही पाचव्या, सहाव्या वेतनआयोगाचा फायदा घेऊन उच्च मध्यमवर्ग झाला तर काही असुरक्षित रोजगारामुळे खाली फेकला गेला परंतु सर्व योजनांमधून हा निम्न मध्यमवर्ग वगळला गेला. त्या वर्गाच्या दरिद्रीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली.
* गरिबीचे प्रमाण बरेच वाढले, परंतु सरकारी अधिकृत दारिद्र्यरेषा इतकी संकुचित झाली की खरी गरिबी त्या रेषेशी म्हणजेच त्यातील निकषांशी जुळवता, मोजताच आली नाही, त्यामुळे ती रेषेच्या आत आली नाही.
* विषमता प्रचंड प्रमाणात वाढली, जगातील सर्वांत जास्त श्रीमंत पण आपल्याच देशात असताना जागतिक भूक निर्देशांकानुसार व बालक कुपोषणाच्या दराचे प्रमाण पहाता आपण सब-सहारन आफ्रिकेच्यापण खाली, 66 व्या क्रमांकावर आहोत.

या पार्श्वभूमीवर देशाच्या अन्नसुरक्षेचा प्रश्न तपासायला हवा, व या संदर्भात रेशनव्यवस्थेची म्हणजेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेची आजची स्थिती समजून घ्यायला हवी.

आपल्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे तीन प्रमुख उद्देश आहेत.

1) आपत्कालीन परिस्थितीची तरतूद म्हणून बफर स्टॉक राखणे.
2) शेतकऱ्यांना हमीभाव देणाऱ्या व्यवस्था.

3) बाजारात धान्याचे भाव वाढले तरी गरिबांना स्वस्त धान्य उपलब्ध करून देणे.

हे तीन्ही उद्देश तसेच त्या उद्देशांशी निगडित समूहांचे हितसंबंध या यंत्रणेत गुंतले आहेत.

अन्नटंचाई व दुष्काळाच्या काळात रेशनव्यवस्थेचे काम महत्त्वाचे राहिले आहे. 70-80 च्या दशकात रेशनव्यवस्थेवर देशातील मोठ्या प्रमाणातील लोकसंख्या अवलंबून होती. ८0-90 च्या दशकातही रेशनव्यवस्थेच्या अनागोंदी कारभाराविरुद्ध, दुकानदार व अधिकारी यांच्या साखळीतून होणाऱ्या भ्रष्टाचाराविरुद्ध मोर्चे निघत असत. त्यात मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणात सहभागी होत असे. त्यानंतर मात्र देशभरात धान्याचे प्रमाण वाढले व मध्यम वर्गातून वरच्या वर्गाकडे सरकलेल्या समूहांचे रेशनव्यवस्थेवरील अवलंबित्व कमी झाले. परंतु असा वर्ग जेमतेम 25 टक्के होता. मात्र हाच समाजातील बोलका वर्ग होता.

1990-2000 या दशकात जागतिकीकरणाचे वारे सुरू झाले, व आर्थिक साम्राज्यवादाने साऱ्या जगाला घेरले. बाजारव्यवस्थेच्या आड येणारी सर्व नियंत्रणे दूर करण्यासाठी भांडवलाला जगभर मुक्तद्वार देणारी धोरणे आंतरराष्ट्रीय दबावाखाली आकार घेऊ लागली. त्यामध्ये रेशनव्यवस्थाही अडकली.

शेतमालाच्या बाजारपेठेतून सरकारने बाजूला व्हावे असा दबाव सुरू झाला व त्याचबरोबर एवढी प्रचंड सबसिडी देणारी अवाढव्य रेशनयंत्रणा बंद करण्यासाठी दबाव वाढत राहिला.

परंतु गरीब समूहांचे संरक्षण-कवच राहिलेल्या रेशनयंत्रणेस एकदम टाळे लावल्यास असंतोष माजला असता. त्यामुळे त्याचा आकार कमी करण्याची पद्धतशीर योजना सुरू झाली. 1997 पासून लक्ष्याधारित रेशनव्यवस्थेच्या नावाखाली तीनस्तरी रेशनव्यवस्था सुरू करण्यात आली.

सर्वांत गरीब समूहांना अन्नधान्य स्वस्त दरांत पुरवण्याची जबाबदारी आम्ही झटकत नाही, असे म्हणतकमीत कमी गरीब या योजनेत सामावले जातील अशी रचना आखत रेशनव्यवस्थेचा आकार कमी करण्यात आला. सार्वत्रिक रेशनव्यवस्था मोडीत काढण्यात आली. बदलत्या भांडवली हितसंबंधांच्या वातावरणात याविरुद्ध मोठा आवाज उठला नाही. तीनस्तरी कार्डे देण्यामुळे सर्वांनाच रेशनकार्डाचे संरक्षण असल्याचा आभासही निर्माण करण्यात आला.

प्रत्यक्षात मात्र गेल्या 12-13 वर्षांचा अनुभव सांगतो की, तीन स्तरांपैकी सर्वांत वरच्या स्तराला तर रेशनमधून बाहेर काढण्यात आलेच, पण त्यापेक्षा खालच्या स्तराला, ज्यांचे वार्षिक उत्पन्न 1 लाखाच्या आत आहे त्यांना, जवळपास कधीच धान्य मिळाले नाही. हा केशरी कार्डधारकांचा गट आहे, ज्यामध्ये गिरणी कामगार, कारखाना कामगार, असंघटित, फेरीवाले, रिक्शावाले, छोटे दुकानदार, छोटे शेतकरी, बारा बलुतेदार इ. समूह मोडतात. हा गरिबीच्या काठावरील समूह आहे. अर्थव्यवस्थेतील अस्थिरता या समूहालाही मोठा फटका देते. परंतु हा समूह सर्व प्रकारच्या सुरक्षा-कवचातून बाहेर फेकला गेला. त्यांच्यासाठी असलेल्या धान्यसाठ्याला विविध वाटा फुटल्या; पण ते त्यांना मिळाले नाही. एवढेच नाही तर ज्या गरीब समूहांना संरक्षण व अन्नसुरक्षा देणार असे धोरणात्मकरीत्या घोषित करण्यात आले, त्यांपैकी एकाही समूहाला खऱ्या अर्थाने दारिद्र्यरेषेत सामावण्यात आले नाही, मग ते दलित/आदिवासी असोत, अत्यल्पभूधारक असोत, भटके विमुक्त असोत, की शहरातील फूटपाथवासी, असंघटित, असुरक्षित कामगार असोत. दारिद्र्यरेषेच्या नावाखाली गरीब कोण व किती ते ठरवण्याचे अधिकार व पद्धत अधिक केंद्रित करण्यात आली. ग्रामसभांना याबाबत अधिकार देण्याचा आभास निर्माण करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात अधिकार केंद्रीकृतच राहिले.

या सगळ्या पुनर्रचनेमागे अधोरेखित भूमिका होती ती लाभार्थींची संख्या कमीत कमी ठेवण्याची, व हा समूह 'तोडो-फोडो'च्या रणनीतीने विखुरलेला ठेवण्याची. ती संपूर्णपणे यशस्वी झाली आहे.

अन्नसब्सिडीची अर्थसंकल्पातील तरतूद वाढली असली तरी ती अद्याप देशाच्या एकूण अर्थसंकल्पाच्या 1% देखील नाही. ती वाढूनही प्रत्यक्षात गरीब समूह व अतिगरीब समूहदेखील त्यातून मोठ्या प्रमाणात बाहेर फेकले गेले आहेत. रेशनव्यवस्थेमधील भ्रष्टाचार ही तर सनातन समस्या आहेच, पण रेशनव्यवस्थेची अशा प्रकारची रचना हीच रेशनच्या रूपाने अन्नसुरक्षा सर्वांत गरीब समूहांपर्यंत पोचण्यामधील सर्वांत मोठी अडसर ठरली आहे. ज्या राज्यात जास्तीत-जास्त लोकसंख्या सामावून घेण्याची वा सार्वत्रिक रेशनची व्यवस्था आहे तिथेच ती प्रभावी ठरली आहे.

आता तर पिवळ्या (दारिद्र्यरेषेखालील) व केशरी (दारिद्र्यरेषेवर पण एक लाख वार्षिक उत्पन्नाच्या आत) कार्डावरील धान्याचे प्रमाणही कमी करण्यात येत आहे. कष्टकरी समूहातील एका कुटुंबाची महिन्याची एकूण गरज किमान 60 कि. धान्याची आहे. त्यापैकी 35 कि. आतापर्यंत रेशनवर, तेही फक्त दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना देय होते. आता मात्र त्याचेही प्रमाण 25 कि.वर व केशरी कार्डधारकांना 15 कि.वर आणण्यात येत आहे. वाढती महागाई, दुष्काळाचे सावट, अन्नधान्याची अपुरी उपलब्धता असताना सरकारने हा काढता पाय घ्यायला सुरुवात केली आहे.

प्रत्यक्षात कार्ड मिळणे, रेशन दुकानातून एकूण देय असणारे धान्य मिळणे, या पातळीवरचे अन्याय तर आहेतच. 110 कोटींच्या देशात केवळ 6.52 कोटी दारिद्र्यरेषेखालील कार्डे आवश्यक असल्याचा अंदाज नियोजन आयोगाने 2002 मध्ये व्यक्त केला होता. प्रत्यक्षात 77% जनता गरिबीच्या खाईत असल्याचे अनुमान डॉ. सेनगुप्ता कमिटीने काढले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात ज्या देशात जनता असुरक्षित आहे, भुकेली आहे, तिथे सार्वत्रिक रेशनव्यवस्थाच आवश्यक आहे. ती लक्ष्याधारित करण्याचा डाव हा व्यवस्था संकुचित करत ती संपवत नेण्याचाच डाव होता, हे आतापर्यंतच्या अनुभवावरून उघड झाले आहे.

अन्न सब्सिडी कमी करण्याचे याच वाटेवरील पुढचे पाऊल आता सरकार उचलू

पहात आहे ते म्हणजे फूड स्टॅम्पचे. जिथे आतापर्यंत ही योजना आहे अशा सर्व देशांत अन्न सब्सिडीचे प्रमाण घसरत गेले आहे. श्रीलंका, जमैका, ट्युनिशिया, येथील अनुभव हेच सांगतो. वंचित समूहाच्या अन्नसुरक्षेच्या निकषावर तेथे ही योजना तपासायची झाली तर ती पूर्णपणे अपयशी ठरली, असे म्हणावे लागते. सर्व देशांत तेथील गरिबांच्या आहारावर, पोषणावर फूड स्टॅम्पमुळे वाईट परिणाम झाला.

आपले अन्नविषयक धोरणही सर्व गरीब-समूहांना अन्नसुरक्षा देण्याचे धोरण मांडत नाही, तर अन्नसुरक्षेवरील सब्सिडी आटोक्यात ठेवण्याचे उद्दिष्ट मांडते. उद्देशच हा असेल, तर त्या दिशेतले प्रत्येक पाऊल हे लाभार्थी कमीत कमी करण्याच्या दिशेनेच पडणार; प्रत्यक्षात गरिबांची संख्या कितीही वाढो.

अमेरिकेसारख्या प्रगत औद्योगिक देशात फूड स्टॅम्प योजनेद्वारे (ज्यावर 1.8 अब्ज डॉलर्स खर्च केले जातात.) एक कुटुंब जेव्हा त्या कुटुंबाचे उत्पन्न त्यांच्या पौष्टिक जेवणाच्या गरजेच्या तिप्पट असते तेव्हा अन्नावरील अनुदानासाठी पात्र ठरते. थोडक्यात जर एखादे कुटुंब एकूण उत्पन्नाच्या 1/3 पैसे जेवणावर खर्च करीत असेल, तर ते तेथील रेशनकार्ड मिळवण्यास पात्र ठरते. या निकषानुसार तर भारतातील 90% जनता अन्नसुरक्षा योजनेसाठी पात्र ठरायला हवी.

एवढ्या प्रचंड मोठ्या समूहाच्या अन्नपुरवठ्याचा विचार करायचा असेल, किंबहुना डॉ. सेनगुप्ता कमिटीच्या अहवालात अभिप्रेत 77% असुरक्षित, असंघटीत जनतेचा अन्नाचा अधिकार संरक्षित करायचा असेल, तर सार्वत्रिक रेशनव्यवस्थेशिवाय पर्यायच नाही. ज्यांना अन्नाची गरज नाही ते स्वेच्छेने या व्यवस्थेतून बाहेर पडू शकतात, व तामिळनाडूप्रमाणे No commodity कार्ड घेऊ शकतात. उर्वरित सर्व लोकसंख्या ज्यांना अन्नाची गरज पूर्ण करण्यासाठी अन्नसुरक्षा योजनेचे कवच आवश्यक वाटते, त्या सर्वांसाठी रेशनव्यवस्था हवीच, व ते उद्दिष्ट केवळ सार्वत्रिक रेशनव्यवस्थेतच गाठता येईल.

कोणत्याही योजनेची परिणामकारकता व प्रत चांगली राहण्यासाठी समाजातला स्थिरावलेला, बोलका वर्ग त्या व्यवस्थेशी जोडलेला असावा लागतो. ''केवळ गरिबांसाठीच'' असे म्हणून बाजूला काढलेल्या योजनेचे संकुचित होत जाणे, तिचा दर्जा खालावत जाणे, हे त्या योजनेच्या रचनेतच अंतर्भूत असते; हेही अनुभवातून सिद्ध झाले आहे.

देशातील 77% जनतेची अन्नसुरक्षा धोक्यात असणे, हे कोणत्याही प्रगल्भ लोकशाही राष्ट्राला विशेषतः स्वातंत्र्यानंतर साठी उलटल्यावर, व स्वतःला महासत्ता म्हणवून घेणाऱ्या राष्ट्राला परवडणारे नाही. साऱ्या देशाच्या अंतर्गत सुरक्षेवरच त्यामुळे धोक्याचे सावट राहते, हे विसरून चालणार नाही.

ज्या देशात आर्थिक उलाढाल वाढवण्यासाठी सेझच्या नावाखाली बलाढ्य उद्योगसमूहांना 1 लाख 75 हजार कोटींच्या करसवलती मोकाटपणे दिल्या जातात. तेथे याच उद्योगांचा पाया व राष्ट्राचा पाया असणारे मानवी बळ मजबूत व सशक्त ठेवण्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद करणे हे प्राधान्याचे व राष्ट्रहिताचे पाऊल म्हणून उचलले जायलाच हवे.

*पत्ता*

□□



# अन्न-अधिकार-कायदा ह्व योजनेपासून हक्कापर्यंत

*अश्विनी कुळकर्णी, दीप्ती राऊत*

गेल्या दोन दशकांत भारताची एकूण आर्थिक प्रगती वेगात सुरू आहे. तरी आजही मोठी लोकसंख्या गरिबीच्या वर्गात मोडते. त्यामुळे या गरीब जनतेची अन्नासारख्या मूलभूत गरजेची पूर्तता होणे, कल्याणकारी राज्यरचना स्वीकारलेल्या आपल्या देशात अगत्याचे ठरते. याच उद्देशाने रेशनव्यवस्था सुरू करण्यात आली. मात्र, रेशनव्यवस्था सुरू करण्यात आली तो काळ आणि आजचा काळ याचे संदर्भ खूप वेगळे आहेत. गरिबांचा विकास या सेवाधिष्ठित कल्याणकारी भूमिकेसोबतच गरिबांना सन्मानाने जगण्याचा अधिकार हा हक्काधारित दृष्टिकोण गेल्या काही वर्षांमध्ये पुढे येत आहे. त्यातूनच शिक्षण, आरोग्य, रोजगार यांकडे केवळ कल्याणकारी योजनांच्या भूमिकेतून नाही, तर त्यापलीकडे जाऊन घटनात्मक अधिकार म्हणून पाहिले जात आहे. त्यातूनच अन्न-अधिकार-कायदा पुढे आला आहे.

कल्याणकारी योजनेच्या अंमलबजावणीसाठी सरकारी यंत्रणा असते. योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटींबद्दल रस्त्यावरील आंदोलनापासून विधिमंडळातील निर्णयांपर्यंत अनेक पर्यायांनी तोडगा काढण्याचे प्रयत्न होतात. मागण्या केल्या जातात, चर्चा होतात, पर्यायांची चाचपणी होते, उत्तरे शोधली जातात आणि बदल होत राहतात. मात्र, ही प्रक्रिया त्या त्या योजनेपुरती तुकड्यांत घडते. तिचा व्यापक परिणाम किंवा प्रभाव मर्यादित राहतो. त्यापुढे जाऊन, त्यास कायद्याची घटनात्मक चौकट लाभली तर त्याच्या अंमलबजावणीची आणि व्यापक, दूरगामी परिणाम साधण्याची शक्यता अधिक बळकट होते. आज आपल्याकडे गरीब उपेक्षित समूहांची अन्नाची गरज भागवण्याच्या उद्देशाने रेशनिंग, जननी-सुरक्षा-योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी पेन्शन योजना, अन्नपूर्णा यांसारख्या योजना राबवल्या जात आहेत. त्यासाठी सरकार अनुदाने देते. त्यांच्या सक्षम अंमलबजावणीसाठी वेळोवेळी वर उल्लेखलेल्या बदलाच्या प्रक्रिया होतही आहेत. मात्र, या योजना वेगवेगळ्या खात्यांतर्फे राबवण्यात येत असल्याने त्यांच्यातील समन्वयाचा अभाव, ही महत्त्वाची कमतरता जाणवते.

गरिबांपर्यंत पोषक व पूरक अन्न पोहोचवणाऱ्या या योजनांची अंमलबजावणी पडताळून पाहण्याचे काम देशपातळीवरील अन्न-अधिकार-अभियान गेल्या काही वर्षांपासून

करत आहे. महाराष्ट्रात रेशनिंग कृतिसिमितीसारख्या रेशनच्या प्रश्नावर कार्यरत संस्था-संघटना हे काम करीत होत्याह्वह्वआहेत. त्यांच्या अनुभवांतून आणि कामांतून एक मुद्दा वेळोवेळी पुढे आला, तो म्हणजे गरिबांना अन्न न मिळण्यात अन्नधान्याचा तुटवडा हे आपल्याकडील कारण नाही. सरकारी गोदामांमध्ये मुबलक प्रमाणात अन्नधान्य उपलब्ध असतानाही ते उचित लाभार्थीपर्यंत पोहोचतच नाही, ही त्यातील खरी गोम आहे. त्यासाठी पीपल्स युनियन ऑफ सिव्हिल लिबर्टीज या स्वयंसेवी संस्थेने सन 2001 मध्ये सर्वोच्च न्यायालयात जनहित-याचिका दाखल केली. मध्याह्न-भोजन, पूरक आहार, रेशन-व्यवस्था या साऱ्या अन्नसुरक्षेशी संबंधित योजनांचा समावेश त्या याचिकेत करण्यात आला. त्याच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्देश दिले. त्यांतील एका आदेशात अन्नसुरक्षा हा गरिबांचा मूलभूत अधिकार असल्याचे न्यायालयाने नमूद केले. तो धागा धरून अन्न-अधिकार-अभियानाने याला घटनात्मक अधिकाराच्या चौकटीत स्पष्टपणे आणण्यासाठी अन्न-सुरक्षा-कायद्याची मागणी केली.

केंद्र सरकारनेही सदर अन्न-सुरक्षा-कायद्यास अनुकूलता दाखवत त्याची घोषणा करण्याचे आश्वासन जाहीर केले. सरकारच्या या भूमिकेचे संस्था/संघटनांनी स्वागतच केले. पण सोबतच अनेक पातळ्यांवर चर्चा घडवून आणत हा कायदा अधिकाधिक लोकाभिमुख आणि अन्न-अधिकाराचे रक्षण करणारा कसा होईल, या दिशेने वाटचाल सुरू आहे. या कायद्यात कोणत्या योजना असाव्यात, त्यांचे निकष काय, त्या कोणासाठी असतील, त्या लाभार्थीपर्यंत कशा पोहोचाव्यात, न पोहोचल्यास काय, याबाबत विविध स्तरांवर तसेच विविध मुद्द्यांवर विचारविमर्श घडवून आणला जात आहे. त्यातून अन्न-अधिकार-कायद्याचा मसुदा तयार झाला आहे.

**आता आपण अन्न-अधिकार-अभियानाचा मसुदा पाहू या**

एक सर्वांत मोठा आणि संवेदनशील मुद्दा या मसुद्यात उपस्थित करण्यात आला आहे तो म्हणजे लाभार्थी कोण व ते कसे ठरवायचे याच्या निकषांबद्दल. सध्या मध्याह्न-भोजन किंवा अंगणवाडीतील पोषक आहार यांसारख्या योजना सर्वांसाठी खुल्या आहेत. रेशन-व्यवस्था लक्ष्याधारित करण्यात आली आहे. रेशनव्यवस्थेत विविध प्रकार करण्यात आलेले आहेत. यामुळे आता खूपच कमी लोकांना सरकार खऱ्या अर्थाने स्वस्त धान्य देत आहे. बीपीएल् आणि एपीएल् अशा दोन वर्गांत गरिबांना विभागले आहे. दारिद्र्यरेषेखालील व जरा बरे असे केल्यामुळे बरेच वंचित लोक स्वस्थ धान्य मिळवू शकत नाहीत. ही परिस्थिती अन्यायकारक आहे.

दारिद्र्यरेषेसंदर्भात दोन मुद्दे आहेत. पहिला, सरकारी नियोजनासाठी देशात एकूण किती गरीब आहेत याचा अंदाज बांधणे; आणि दुसरा म्हणजे नेमके गरीब ओळखायचे कसे याचे निकष. या गणना आणि निकष या दोन्ही मुद्द्यांवर आतापर्यंत भरपूर चर्चा झाली आहे. या मसुद्यात आताची गरिबीची व्याख्या, मोजमापाचे निकष, मोजमापाच्या पद्धती, यासंबंधी खूप नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. सध्या सरकारी पातळीवर वापरण्यात



येणारी कोणतीही पद्धती वापरली तरी काही गरीब अन्न-अनुदानापासून वंचित राहू शकतात. म्हणून रेशन-व्यवस्था सार्वत्रिक असावी, लक्ष्याधारित नसावी असे यात मांडण्यात आले आहे. अर्थात सार्वत्रिक हा शब्द वापरताना, उच्च वर्ग त्यातून वगळला जावा असे त्यात अभिप्रेत आहे.

यामध्ये वर उल्लेख केलेल्या अन्न-सुरक्षा देणाऱ्या नऊ योजनांचा विचार करण्यात आला आहे. आज विविध खात्यांतर्फे या योजना राबविल्या जात असताना, त्यांच्यातील समन्वयाचा अभाव ही महत्त्वाची मर्यादा पुढे येत आहे. त्यामुळे या खात्यांमधील समन्वय ही या कायद्यातील महत्त्वाची सूचना आहे. तसेच, काही घटक या योजनांमधूनही वगळले गेलेले आहेत. ज्यांना कागदपत्र सादर करता येत नाहीत, जसे फूटपाथवर राहणारे. कचरा वेचणारे, वेश्याव्यवसायातील स्त्रिया, यांना या सर्व लाभांपासून वंचित राहावे लागते. यांचा विचार करण्यासाठी गरिबाची व्याख्याच बदलायला हवी असे यामध्ये म्हटले आहे.

या कायद्याच्या अमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी अन्न व पोषण आयुक्तालय असावे, असे यात म्हटले आहे. या आयुक्तालयात पाच सदस्य असावेत व त्यात महिलांची संख्या अधिक असावी, किमान एक तृतीयांश दलित आणि/अथवा आदिवासी व अल्पसंख्यक असावेत यांसारखे त्याच्या कामकाजाचे तपशीलही सांगण्यात आले आहेत. राष्ट्रीय पातळीवर दर तीन वर्षांनी एक आरोग्य व पोषणासंदर्भात सर्वेक्षण व्हावे असे मांडले आहे. या कायद्यातील योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता असावी यासाठी माहितीच्या अधिकाराच्या कायद्यानुसार स्वतःहून सर्व माहिती खुली करण्याची तसेच सोशल ऑडिट किंवा चावडीवाचनाची तरतूद असावी, असे सूचित करण्यात आले आहे. जिल्हापातळीवर या योजनांच्या अंमलबजावणीतली तक्रारींचे निरसन करणारी व्यवस्था असावी, त्यांनी तक्रारींचे निरसन कसे करावे तसेच त्यात काय शिक्षा असावी, याबाबत मांडणी केली आहे.

हा मसुदा खूप व्यापक आणि दूरगामी आहे. अतिदुर्लक्षित, वंचित घटकांसोबत काम करणाऱ्या संस्था संघटनांच्या अनुभवांचा आणि विचारांचा यावर प्रभाव आहे. आज शहरात गरिबांची, बेघरांची संख्या वाढते आहे. त्यांच्याकडे कागदपत्रे नसल्याने, अन्न-अनुदानापासून ते वंचित राहतात. अशा वंचितांचा विचार करण्याची गरज यात मांडण्यात आली आहे. तसेच, आपत्कालीन परिस्थितीतही अन्नसुरक्षेचे धोरण या कायद्याच्या कक्षेत असावे असे मांडण्यात आले आहे.

याविषयी सरकारात, अन्नमंत्रालयाने एक टिपण केले आहे. त्यात काय मांडलेले आहे ते पाहूयाह्व

स्वयंसेवी संस्था/संघटनांनी एवढा विचार करून हा मसुदा तयार केला आहे. मात्र, त्या तुलनेने सरकारच्या बाजूने तेवढी हालचाल दिसत नाही. सरकारच्या विविध खात्यांनीही एकत्र येऊन परस्परसमन्वयाने त्यांच्या दृष्टीने असा मसुदा तयार करायचा आहे. अन्न व नागरी पुरवठा खाते आणि नियोजन खाते ह्यांचेबाबतचे थोडे म्हणणे पुढे येत आहे.

अन्नसुरक्षेसाठी लागणारी अन्नधान्याची उपलब्धता, रेशन व इतर योजनांसाठीचा पुरवठा व त्याचे वितरण ही प्रामुख्याने अन्नमंत्रालयाची जबाबदारी आहे. त्यांनी अन्न-अनुदानाबाबत एक टिपण प्रसारित केले आहे. त्यानुसार भारतातील प्रत्येक नागरिकाची अन्नसुरक्षा व पोषण ही सरकारची जबाबदारी असली तरी अन्न-अनुदान सरकार गरीब व वंचितांनाच देणार, असे त्यात नमूद करण्यात आले आहे. यात प्रामुख्याने रेशनव्यवस्थेसंबंधी मुद्दे मांडण्यात आले आहेत. अन्नधान्याची उपलब्धता काय व मागणी किती यासंदर्भात इतर योजनांचा मोघम उल्लेख आहे. अन्नसुरक्षा हा राज्यांचा विषय आहे. आणि रेशनव्यवस्था पंचायती राजसंस्थांच्या स्वाधीन करण्याचा मुद्दाही यात मांडण्यात आला आहे.

या टिपणात सर्वाधिक चर्चा रेशनच्या व्यवस्थेतील लाभार्थींबाबत करण्यात आली आहे. 1993-94 च्या नियोजन आराखड्यानुसार 6.52 कोटी कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली असल्याचे दिसते. या आकड्यावर आधारित राज्यांची आकडेवारी काढून राज्यांना धान्यपुरवठ्याचे नियोजन करावे लागते. पण, छत्तीसगड, तामीळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक यांसारख्या राज्यांना अधिक प्रमाणात दारिद्र्यरेषेची कार्डे मिळाली आहेत. त्यामुळे ते केंद्राच्या नियोजनापेक्षा कितीतरी अधिकपटीने धान्य केंद्राकडून उचलतात. त्यामुळे होणाऱ्या वाढीव खर्चाचा भार ते स्वतःवर घेतात, पण पुरवठ्याचा अधिक भार केंद्राला सोसावा लागलो. परिणामी केंद्राच्या अनुदानाबाबत राज्याराज्यात तफावत येते. हे टाळण्याची गरज अन्न मंत्रालयाने मांडली आहे. त्यामुळे एकूण किती गरीब आहेत याचा ऊहापोह यात विस्ताराने करण्यात आला आहे. केंद्र शासन पाच वर्षांतून एकदा दारिद्र्यरेषेची पाहणी करून यादी नक्की करेल, असे यात मांडण्यात आले आहे. या यादीशिवाय स्वस्त दरात राज्यांना अन्नधान्य द्यावयाचे असेल तर तसे पूर्णपणे स्वतःच्या जबाबदारीवर करावे, केंद्र सरकारकडून वाढीव पुरवठ्याची अपेक्षा करू नये, असेही नमूद केले आहे.

आताच्या परिस्थितीत पिवळे (अंत्योदय), केसरी (अन्नपूर्णा) या कार्डधारकांनाच संपूर्ण कोटा देणे शक्य होत नसल्याचेही यात सरकारने कबूल केले आहे. केशरी कार्डधारकांना संपूर्ण कोटा देऊ शकू अशी गॅरंटी केंद्र सरकार घेऊ शकत नाही असे यात स्पष्ट केले आहे. सध्या 35 किलोप्रमाणे अंत्योदय व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी 277 लाख टन धान्याची प्रतिवर्षाची गरज यात व्यक्त करण्यात आली आहे. नियोजन विभागाच्या नवीन अंदाजाप्रमाणे गरीब कुटुंबांची संख्या 36 टक्के(1993-94) वरून 27.5 टक्के (2004-05) आलेली आहे. जरी बीपीएलची संख्या 6.52 कोटींवरून 5.91 कोटीवर घटलेली असली तरी एपीएलची संक्या 19.52 कोटींवरून 15.84 कोटीवर पोहोचलेली आहे. या आकडेवारीनुसार केंद्रसरकारला प्रत्येक वर्षासाठी बीपीएलसाठी 251 लाख टन आणि एपीएलसाठी 202 लाख टन अन्नधान्याची आवश्यकता आहे. मात्र, एवढा साठा प्रत्येक वर्षी सातत्याने असेलच अशी खात्री देणे केंद्र सरकारला अवघड वाटत असल्याचे यात स्पष्ट केले आहे.

राज्य सरकारने रेशनमध्ये गहूतांदळासोबत भरड धान्याचा समावेश करावा,



किंबहुना, ही बाब राज्य सरकारांवर सक्तीची करावी असेही यात नमूद करण्यात आले आहे.

सध्या दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांच्या अन्नधान्याच्या पुरवठ्यासाठी 37,000 कोटी रुपये लागतात. पुढे जर तीन रुपये किलोने धान्य वितरित करायचे ठरवले तर सध्याच्या लाभार्थी संख्येसाठी 40,380 कोटी रुपयांची गरज भासेल असा खर्चाचा अंदाज यात वर्तवण्यात आला आहे.

अंमलबजावणीतील तक्रारींच्या निवारणीसाठी सरकारच्या टिपणातही ट्रिब्यूनलची शिफारस करण्यात आली आहे. थेट तालुकापातळीवरही त्याची सोय असावी असे नमूद करण्यात आले आहे. तसेच, सर्व आकडेवारीचे संगणकीकरण करून ती सर्वांसाठी खुली करावी, विहित मुदतीत योजना काहींपर्यंत पोहोचली नाही तर त्यांना अन्नसुरक्षा भत्ता मिळावा. वेळोवेळी या योजनांचे सोशल ऑडिट करण्यात यावे या मुद्द्यांचा समावेश आहेच.

सरकार आणि स्वयंसेवी संस्था या दोन्ही गटांनी मांडलेल्या मुद्द्यांचा विचार करता, यात अन्य योजनांच्या तुलनेत रेशन यंत्रणेविषयी अधिक विचार केल्याचे जाणवते. अन्न अधिकार अभियानाच्या मसुद्यात याविषयीची चर्चा विविध अंगांनी आली आहे. त्या तुलनेत सरकारच्या टिपणात एकूण धान्याची उपलब्धता, खर्चाची व्यवहार्यता यांची चर्चा अधिक आहे.

नेहमी योजना कोणतीही असो वा कायदा कोणताही असो, कळीचा मुद्दा असतो तो अंमलबजावणीचा. धोरणासोबतच धोरण राबवणारी यंत्रणाही तितकीच किंबहुना कणभर अधिकच महत्त्वाची असते. त्यामुळे अन्नसुरक्षा कायद्याचीच प्रभावी व वेगवान अंमलबजावणी व्हावी यासाठी तिच्या फेरतपासासाठी माहिती तंत्रज्ञान, व्यवस्थापन शास्त्र या अनुषंगानेही दोन्ही पातळीवर चर्चा व विचारविमर्श होणे गरजेचे आहे.

*पत्ता*

# वैचारिक प्रवास : भेदाकडून अभेदाकडे जाणारा

*किशोर बेडकीहाळ*

**विचारवंत म्हणून साने गुरुजींची प्रतिमा प्रतिष्ठित करणाऱ्या भा. ल. भोळ्यांना साने गुरुजींच्या जयंतीदिनीच मृत्यू यावा हा केवळ योगायोग असेलही, पण त्यातही भोळ्यांचा 'वैचारिक अनुबंध'च प्रकट झाला, म्हणून भोळ्यांच्या लवकर जाण्याने चळवळीची, साहित्य व्यवहारांची, माणुसकीची व अशा अनुबंधाची झालेली हानी ही साचेबंद प्रतिक्रिया राहत नाही, तर मनाच्या**

**दुखऱ्या कोपऱ्यांच्या संख्येत भर टाकणारी ठरते. गेल्या 20 वर्षांहून अधिक काळ जीवाभावाचे संपन्न मैत्र देणाऱ्या या विचारवंत मित्राच्या स्मृतीस हार्दिक अभिवादन.**

निर्भीड, व्यासंगी व साक्षेपी हे तिन्ही शब्द भोळ्यांच्या लेखनात, जीवनव्यवहारात शब्दशः खरे होते. या शब्दांच्या अर्थांची छटा कितीही कमी-जास्त धरली तरी त्यांच्या टीकाकारांना, मित्रांना, वाचकांना हे शब्द वापरण्यास काही पर्यायच उरत नाही. महाराष्ट्राला ज्ञानोपासक भाष्यकारांची एक सकस परंपरा आहे. डॉ. भोळे याच परंपरेतले होते. परिवर्तनवादी विचारविश्वातील प्रा. सरदार ते प्रा. भोळे या परंपरेचे एक वेगळेपण ठळकपणे दिसते, ते म्हणजे भाष्य करून समाजस्थितीचे भान करून देण्याबरोबरच उभयतांनी प्रमाण मानलेल्या विचारवंतांना त्यांच्या अनुयायांसमोर परस्परपूरकतेने उभे करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी तत्त्वदर्शन म्हणून व्यापक आहेत. विश्वात्मक असणाऱ्या व होऊ पाहणाऱ्या विचारधारांच्या त्या पाईक आहेत, पण त्यांचा व्यवहार मात्र परस्परवर्जक स्वरूपाचा आहे. अनुयायांच्या डोक्यावरील इतिहासाची ओझी, त्यांच्या अस्मितांच्या रूपात प्रत्यक्षात वावरत असल्याने समता चळवळीला प्रमाणभूत असणाऱ्या मूल्यांचे आविष्कार भिन्न व परस्परविरोधी स्वरूपात घडताना दिसतात. याने सामाजिक चळवळीचे पाऊल पुढे पडायच्या ऐवजी जैसे थेच राहते, त्याचा फायदा प्रस्थापितांनाच होतो. या वास्तवाचे तीव्र भान प्रा. सरदारांप्रमाणेच प्रा. भोळे यांच्या लेखनातही दिसते. परंपरा, धर्म, संस्कृतीविचार आदींबाबत तर हे भान त्यांच्या लेखनात जागोजाग दिसते. या भानातून जसा प्रा. सरदारांनी लोकवाङ्मयाचा वेगळा (ऐतिहासिक दृष्टिकोणातून) अर्थ लावला, तसाच वेगळा अर्थ प्रा. भोळे यांनी फुले-आंबेडकर-शाहू-गांधी-मार्क्स यांच्या बाबतीत लावला आहे. या साऱ्यांच्या विचारधारांचे मूलगामी, कालोचित असे परिष्करण करून त्यांना अनुयायांच्या 'बंदिस्त' पिंजऱ्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न या विरोधकांच्या तथाकथित हिंदूकरणातून सोडवण्याचा प्रयत्न एकाच वेळी करण्याचे आह्वान प्रा. भोळे यांनी लीलया पेलले, म्हणून प्रा. सरदारानंतरची त्यांची परंपरा चालवणारा 'प्रबोधन-व्रती' असे त्यांचे वर्णन जास्त वास्तव ठरते. सत्तरीच्या दशकात डॉ. भोळे यांच्या लेखनाला सुरुवात झाली, त्यावेळी साहित्य, राजकारण व समाजकारण या तिन्ही क्षेत्रांत प्रस्थापितांना हादरे बसत होते. दलित समूहांच्या शिक्षित फळीने आपले हक्क, व्यवस्थेतील आपला वाटा मागत, व्यवस्थेलाच आह्वान दिले होते. हे आह्वान इतके मूलगामी होते की परिवर्तनाच्या विश्वातही त्याने खळबळ माजली. म. फुल्यांचे नव्याने मूल्यमापन करण्याचाही हाच काळ होता आणि मधल्या जातींच्या उठावामुळे राजकारण स्पर्धाशील होण्याचाही हाच काळ होता. शिक्षित दलितांच्या अनुभवाने बद्ध झालेल्या साहित्यकृतींनी पांढरपेशे समाजस्तरही हादरून जाण्याचा हाच काळ होता. विविध विचारप्रणालींवर आधारलेले संघर्षशील गटही याच काळात टोकदार होताना दिसतात. हा सर्वच काळ घुसळणीचा होता, तसा पुरोगामी चळवळींतर्गत परस्परांपासून अंतर राखणाराही होता. काळाची ही पार्श्वभूमी घेऊन



भोळ्यांमधील अभ्यासक लिहिता झाला. राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, साहित्य अशा विविध क्षेत्रांत डॉ. भोळ्यांना मुळातच रुची असल्याने आपली रुची, तत्कालीन वास्तव व परिवर्तनवादी मानस यांचा 'संयोग' त्यांच्या लेखनात झाला. भोळ्यांनी ज्या ज्या विषयांवर लिहिले, त्या प्रत्येक विषयाचे त्यांचे आकलन चोख, कालोचित व एकूण परिवर्तनवादी चळवळ पुढच्या टप्प्यावर जाण्यास उपयुक्त ठरेल, असेच दिसते. प्रा. सरदारांसारखे डॉ. भोळे मार्क्सवादी दृष्टी बाळगत होते, पण ते कम्युनिस्ट झाले नाहीत, फुले-आंबेडकरी चळवळीची तरफदारी करताना ते मार्क्स वा गांधीविरोधी झाले नाहीत. किंबहुना चळवळींना ग्रासणारी द्वंद्वे (उदा. मार्क्स विरुद्ध बुद्ध, गांधी विरुद्ध आंबेडकर) कशी दूर होतील याचाच विचार त्यांच्या लेखनात दिसतो. या द्वंद्वात्मकतेमुळे चळवळींचे समांतरत्व वाढत जाते व एकूणात त्यांची परिणामक्षमता कमी होते. यातूनच परिवर्तनाची सुटी बेटे तयार होतात.त्यातून मग संकुचित अस्मिता, वैचारिक अवरोध यांची मालिका सुरू होते, हीच त्यांची धारणा राहिली. सामाजिक चळवळीतील दैवते मानले गेलेल्या विचारवंतांचे परस्परपूरकत्व पुढे आणणे ही मग त्यांची बांधिलकी झाली. मात्र विविध विचारवंतांचे परस्परपूरकत्व पुढे आणण्यासाठी अर्थांची ओढाताण करणे, पुराव्यांची मोडतोड करणे व विसंगतींकडे कानाडोळा वा दुर्लक्ष करणे अशा गोष्टींची त्यांना गरज पडली नाही. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे 'ऐतिहासिक दृष्टिकोणा'बद्दलची त्यांची चोख समज व त्याचे उपयोजन करण्यातील निरपेक्षता हे होय. या निरपेक्ष उपयोजनामुळेच पुरोगामी व प्रतिगामी अश्या दोन्ही छावण्यांतील अस्मितावाद्यांच्या झुंडशाहीवर व अभिव्यक्तिस्वातंत्र्यावरच्या हल्ल्यांवर, भोळे परखडपणे लिहू शकले. 'आंधळ्या विभूतिपूजेत परिवर्तित होणारे भावनादुखीचे राजकारण व विद्यमान बौद्धिक धुरीणांचे अचिकित्सक अंधानुयायित्व' या चळवळींमधील दोषांवर अचूक बोट ठेवून प्रा. भोळे यांनी परिवर्तनवाद्यांना सावध करण्याचे अत्यावश्यक कार्य केले आहे.

समतेच्या चळवळीत विविध विचारधारांच्या राहुट्या किंवा छावण्या आहेत. या साऱ्यांच्या सर्वच भूमिका भोळ्यांना मान्य नव्हत्या, पण त्यांनी आपल्या विरोधाला वैचारिक मर्यादेतच तारस्वर दिला. मतभिन्नता म्हणजे द्वेषाचा आधार नव्हे, एवढेच सांगून भोळे थांबले नाहीत तर समताविचाराचे समाजात प्रवर्तन करणाऱ्यांसाठी त्यांनी 'संघर्ष किंवा द्वंद्वाच्या नावाखाली द्वेषाधिष्ठित रणनीतींचा अवलंब करणाऱ्या चळवळी समतेत फारसे योगदान करू शकणार नाहीत.' असा इशाराही त्यांनी देऊन ठेवला आहे. विषमता कमी व्हावी किंवा नष्ट व्हावी म्हणूनच्या संघर्षात सबंध समाजालाच (केवळ लाभार्थींना नव्हे) समतेच्या दिशेने नेण्याचे दायित्व समाजधुरीणांनी पार पाडायचे असते, ही समतेच्या चळवळीची गरजच डॉ. भोळे यांनी अधोरेखित केली. त्यांचे सारे लेखन, सामाजिक व व्यक्तिगत व्यवहारही यासाठीच्या सामंजस्यांनी परिपूर्ण होते. भेदाकडून अभेदाकडे, विषमतेकडून समतेकडे जाण्यासाठी द्वंद्ववादाचा निरास होण्याच्या प्रक्रियेला अभ्यासक-भाष्यकार म्हणून भोळ्यांचे हे योगदान फारच मोलाचे आहे. समता विचाराच्या उदारमतवादाच्या मांडणीला जोड देणाऱ्या अमर्त्य सेन प्रभृतींच्या लेखनाची चिकित्सा करून भारतीय संदर्भात त्याच्याही पुढे जाण्याचे

आह्वान दाखवून देऊन एकविसाव्या शतकातील आह्वाने परिवर्तनवाद्यांनाही पेलण्यासाठी काय केले पाहिजे याचेही दिग्दर्शन केले आहे. म. फुले, महर्षि वि.रा.शिंदे, आंबेडकर, गांधी यांच्या समन्वयाचा प्रा.भोळे यांचा प्रयत्न व विद्यमान जागतिक वास्तवाशी जोडून घेऊन व्यापक व्यवस्था-परिवर्तनाशी तो जोडण्याचा त्यांचा प्रयत्न जर एकत्रितपणे पाहिला तर आताच्या समतेच्या चळवळी वैश्विक स्तरावर जाण्यासाठी काय करावे लागले, याचे ते दिग्दर्शनच आहे असे म्हणता येते.

राजकीय-सामाजिक प्रश्नांइतकाच रस भोळ्यांना सांस्कृतिक विश्वातही होता. किंबहुना समाजपरिवर्तनवाद्यांनी सांस्कृतिक प्रश्नांची उपेक्षा करता कामा नये. अशीच त्यांची धारणा होती. सांस्कृतिक विश्वातले अनेक प्रश्न घेऊन त्यांनी लेखन केले. त्यात साहित्यविषयक लेखन फार महत्त्वाचे आहे. समाजातील साहित्य व्यवहार हा अधिकाधिक लोकानुवर्ती कसा होईल, हे पाहणेही परिवर्तन चळवळींचे कामच आहे असे मानून याही क्षेत्रात भोळ्यांनी आपला ठसा उमटवला आहे. सामाजिक शास्त्रांच्या व्यासंगाची पार्श्वभूमी असल्याने भोळ्यांचा साहित्यविचार हा स्वाभाविकच समाजसापेक्ष झाला आहे. मराठी लेखकांची संदिग्ध तत्त्ववैचारिकता, राजकारणाचे वरवरचे व वृत्तपत्रीय आकलन, जनजीवनाविषयीची अत्यंत जुजबी जिज्ञासा, लोकलढ्यांकडे बघण्याचा तुच्छतापूर्ण दृष्टिकोण' याचा मराठी साहित्यव्यवहारांवर झालेल्या परिणामांकडे (*साहित्य अवकाश*, पृ.83-84) लक्ष वेधण्याचे काम करून भोळे थांबले नाहीत, तर त्यातून साहित्य व समाज यातील वाढत्या अंतराकडे त्यांनी निर्देश केला आहे. मराठीतील रूढ आस्वादक समीक्षेपेक्षा वेगळी समीक्षा भोळे यांनी लिहिली ती त्यांच्या समाजसापेक्ष साहित्यविषयक दृष्टीमुळेच. मराठी गद्य शैलीला म. फुल्यांनी दिलेल्या योगदानाचे दर्शन मराठी वाचकांना भोळ्यांनी घडवले तेही याच साहित्यदृष्टीमुळे. भोळ्यांच्या समीक्षादृष्टीत त्यांच्या सामाजिक शास्त्राच्या व्यासंगाचेही उत्तम दर्शन घडते. विद्यमान नवभांडवली बाजारशरण सामाजिक वास्तवाचाही त्यांच्या समीक्षालेखनात संदर्भ दिसतो. डॉ. भोळे यांनी आजच्या बाजारपेठेने व माध्यमांनी जीवनावर केलेल्या परिणामांबद्दलचे अतिशय भेदक विवेचन केले आहे. समाजशास्त्रीय समीक्षा मराठी साहित्यव्यवहारात नवीन नाही, पण तिचा वापर करून लोकजीवन तळापासून ढवळणाऱ्या घटनांच्या परिणामी निर्माण होणाऱ्या प्रवाहांना कवेत घेऊन साहित्य पुढे जाताना दिसते का, हे पाहण्याचा त्यांचा प्रयत्न अर्थपूर्ण व वेगळा म्हणावा लागेल. या दृष्टीने अनेक कलाकृतींची त्यांनी लिहिलेली परीक्षणे, साहित्यविषयक प्रश्नांवरची भाष्ये पाहण्यासारखी आहेत.

भोळे यांनी सततच उत्साहाने समाजसापेक्ष साहित्यकृतींची (उदा. अरुण काळे, संतोष पद्माकर पवार, प्रफुल्ल शिलेदार हे कवी) या दृष्टीतून चिकित्साही केली. समाजसापेक्ष असणे व तिचे कलात्मक असणे यात त्यांना अंतर वाटत नाही. हेही त्यांचे वेगळेपण म्हणावे लागेल. साहित्यव्यवहारातील भाषा या घटकाविषयी भोळे खूपच जागरूक होते. अनेक इंग्रजी शब्दांना त्यांनी मराठी प्रतिशब्द दिले. याबाबत ते आगरकरांचा कित्ता गिरवतात, तर मराठी भाषेतच लिहिणे हा राजवाड्यांचा बाणा जपून फक्त मराठीतच लिहितात. मराठी साहित्याच्या समृद्धीसाठी इंग्रजी, हिंदी ग्रंथही भाषांतरित करतात व भाषांतराबाबतही संस्कृतिसापेक्षतेचे भान दाखवतात.

संस्कृतीकरणाच्या क्षेत्रातही अत्यंत महत्त्वाची घटना असणाऱ्या पूर्वास्पृश्य समाजगटांच्या धर्मांतराचा त्यांनी साक्षेपी आढावा घेतला. यात विपश्यनेच्या मागे पळणाऱ्या नवबौद्ध बांधवांना या भ्रामक विचारापासून परावृत्त करण्याचा त्यांचा प्रयत्न ठळकपणे दिसतो. दलित चळवळीचा आस्थेवाईक पण परखड भाष्यकार ही त्यांची प्रतिमा म्हणून मनावर ठसते. दलितांच्या राखीव जागांवर लिहितानाही डॉ. भोळे यांनी विवेकी आरक्षणाची भूमिका मांडली असून, आर्थिक पायावरील आरक्षणाला सैद्धांतिक व घटनात्मक अंगाने विरोध व्यक्त केला आहे. आरक्षण-समर्थकांच्या आजच्या अनुनयाच्या व बचावात्मक पवित्र्यांच्या काळात स्पष्ट, सडेतोड भूमिका घेऊन आरक्षणाचे फायदे व मर्यादा दाखवून देणारे त्यांचे लेखन दलित चळवळीसाठी नक्कीच दिशादर्शक ठरेल.

डॉ. भोळे यांचा सर्व वैचारिक प्रवास हा त्यांच्या शब्दांत 'भेदाकडून अभेदाकडे' जाणारा आहे. या प्रवासासाठी लागणारे सामंजस्य, साध्य-साधनविवेक, माणसांविषयीची आपुलकी, चळवळींविषयीची आस्था व साक्षेपी दृष्टी यांनी त्यांचे व्यक्तित्व संपन्न व संपृक्त होते. त्यांच्या स्वभावातील खुमासदार मिश्किलीही माणसे जोडण्याच्या त्यांच्या व्रताला बाधा आणू शकली नाही. भोळ्यांच्या लवकर जाण्याने चळवळीची, साहित्य-व्यवहारांची, माणुसकीची व अशा अनुबंधाची झालेली हानी ही साचेबंद प्रतिक्रिया राहत नाही, तर मनाच्या दुखऱ्या कोपऱ्यांच्या संख्येत भर टाकणारी ठरते. गेल्या 20 वर्षांहून अधिक काळ जीवाभावाचे संपन्न मैत्र देणाऱ्या या विचारवंत मित्राच्या स्मृतीस हार्दिक अभिवादन.

*सातारा, (भ्रमणध्वनी - 9423012877)*

□ □